web: http://navakal.org,
e-mail- info@navakal.org
वर्ष-८९ | अंक-३५६ | मुंबई | गुरुवार १ मार्च २०१२ | संपादक : सौ. जयश्री खाडिलकर-पांडे | पाने-८ | किंमत:₹ २
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

एक चळवळ

**राज ठाकरेंना चोख उत्तर**
**पालिका अभियंता वसंत परब यांची खास मुलाखत**
वाचा उद्याच्या अंकात






# चित्रा साळुंखे! त्रिवार सलाम!

**संपादकीय**

**सौ. जयश्री खाडिलकर-पांडे**

**सादर करीत आहेत**

आजचा अग्रलेख लिहिताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. कारण सिध्दार्थ कॉलेजच्या उपप्राचार्या चित्रा साळुंखे यांना त्रिवार सलाम करताना एक आशेचा किरण आम्हाला दिसला आहे. सत्तेच्या प्रचंड शक्तीच्या विरोधात एक नागरिक निराश न होता सतत सात वर्षे लढा देतो ही घटनाच उत्साह वाढविणारी आहे.

चित्रा साळुंखे या सिध्दार्थ कॉलेजच्या उपप्राचार्या होत्या. या कॉलेजात त्या कायद्याचा अभ्यास घेत होत्या. त्याच वेळी त्यांच्या लक्षात आले की, कायद्याच्या परीक्षेलाही न बसलेल्या कुणा के. एल. बिष्णोईला चक्क ७२ टक्के गुण देऊन उत्तीर्ण केले आहे. हा काहीतरी घोटाळा आहे हे लक्षात आल्यावर त्यांनी कॉलेजच्या प्राचार्यांकडे तक्रार केली. पण प्राचार्यांनी दाद दिली नाही आणि इथूनच याविरोधात जीवघेणा लढा सुरू झाला.

प्राचार्य दाद देत नाहीत म्हणताना विद्यापीठात लेखी तक्रार दिली. तेही चौकशीस टाळाटाळ सुरू करू लागल्यावर पास करण्यात आलेला हा बिष्णोई आहे तरी कोण अशी शंका येऊ लागली. चित्रा साळुंखे यांनी माहिती मिळविण्यासाठी आरटीआय टाकला. एक दोन नाही तर २२ आरटीआय टाकल्यावर त्यांना हवी ती माहिती मिळाली. के. एल. बिष्णोई हे आयपीएस अधिकारी होते आणि मुंबईचे पोलीस उपायुक्त होते. इतक्या मोठ्या पदावरच्या आयपीएस अधिकाऱ्याविरुध्द एक सुशिक्षित पण सामान्य माणूस लढू शकतो का? हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात डोकावणारच.

पण चित्रा साळुंखे मागे हटल्या नाहीत. बिष्णोई परीक्षेला बसलेले नसताना त्यांना उत्तीर्ण केले होते हे सिध्द व्हायलाच पाहिजे असा त्यांनी निर्धार केला. पुढचा लढा तर आणखी कठीण होता. सिध्दार्थ महाविद्यालयात त्या उपप्राचार्या होत्या तिथेच त्यांचा मानसिक छळ सुरू झाला. त्यांची केबिनही फोडण्यात आली. त्याविरुध्द तक्रार करायला त्या पोलीस स्टेशनला गेल्या तर पोलीस तक्रार घेत नव्हते. अखेर त्यांनी उच्च पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार न्यायचे ठरविले. किती वेळ आणि पैसा यात खर्च होत असेल. त्यात मानसिक ताण होता. आपल्या १२ वर्षांच्या मुलाला त्या वेळ देऊ शकत नव्हत्या. म्हातारी आई घरी एकटी राहायची म्हणून घराला कुलूप लावून त्या जात होत्या. हे सर्व कशासाठी सुरू होते? त्यांना स्वत:ला यात काडीचाही फायदा नव्हता. केवळ एक आयपीएस अधिकाऱ्याने सत्तेचा फायदा घेऊन केलेला गुन्हा उघड करायचा होता. अशा अधिकाऱ्याला शिक्षा मिळणे यात जनतेचेच हित होते. चित्रा साळुंखेंना काहीच मिळणार नव्हते. त्या जनतेच्या हितासाठी लढत होत्या.

उच्चपदस्थ सात वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांपुढे त्यांनी आपले म्हणणे मांडले. प्रत्येकाने त्यांना चार चार तास बसवून ठेवले आणि मग त्यांचे ऐकून घेतले. मात्र पुढे काहीच केले नाही. एकदा तर त्यांना १२ तास पोलीस ठाण्यात डांबून ठेवले होते. एका पोलीस ठाण्याचा पोलीस अधिकारी केवळ त्यांना त्रास देण्याच्या उद्देशाने सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी चौकशीला बोलावत होता. शेवटी त्याला गळ्यातील सोन्याची चेन दिल्यावर हा ससेमिरा थांबला. अग्निदिव्यच सुरू होते. एक सामान्य नागरिक मोठ्या जिद्दीने लढत होता.

ज्या सात वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांकडे चित्रा साळुंखे यांनी तक्रार केली त्यांनी तर बिष्णोई यांच्या बचावासाठी खोटे अहवाल दिले. यापेक्षा आणखी काय कमाल होऊ शकते.

▶ पुढील अग्रलेख पान ७ वर

## अटक टाळण्यासाठी कृपाशंकर सिंह दिल्लीत
## कुटुंबीयसुद्धा अज्ञातस्थळी रवाना



मुंबई, बुधवार - काँग्रेसचे मुंबईचे माजी अध्यक्ष आणि आमदार कृपाशंकर सिंह यांना केव्हाही अटक होण्याची शक्यता असल्याने कृपाशंकर सिंह हे दिल्लीला पळाले आहेत. त्यांचे कुटुंबीयसुद्धा अज्ञातस्थळी गेले आहे. मुंबईत असलेल्या त्यांच्या तीनही बंगल्यांमध्ये त्यांच्या कुटुंबियांपैकी कोणीही हजर नाही. दिल्लीत जाऊन कृपाशंकर हे आपली अटक टाळण्यासाठी काँग्रेस श्रेष्ठींची मनधरणी करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे समजते.

कृपाशंकर सिंह यांच्याविरोधात वांद्र्याच्या निर्मलनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला असलातरी त्यांना तत्काळ अटक होणार नसल्याचे पोलीस सूत्रांकडून बोलले जाते. मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने कृपाशंकर सिंह यांच्या संपत्तीचा तपशील तपासण्यास लेखापालांना सांगितला आहे. लेखापालांचा अहवाल आल्यावरच कृपाशंकर सिंह यांच्या अटकेबाबत विचार होईल. त्यासाठी किमान दोन महिने तरी लागतील. तरीही कृपाशंकर कुठचीही जोखीम उचलायला तयार नाहीत. ते दिल्लीत जाऊन मोर्चेबांधणी करीत आहेत.

कृपाशंकर सिंह यांच्याविरुद्ध प्रिव्हेन्शन ऑफ करप्शन ॲक्ट व भारतीय दंड विधानाच्या कलम ४२०, ४६७, ४६८ व २०१ खाली गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. स्वत: कृपाशंकर सिंह, त्यांचा मुलगा, मुलगी, पत्नी, जावई यांचा गुन्हेगारांमध्ये समावेश आहे.

## गिरणी कामगारांचा आज मोर्चा
## जन आंदोलन मंचला परवानगी नाकारली

मुंबई, बुधवार - उद्या १ मार्च रोजी गिरणी कामगार एकजूटच्या नेतृत्वाखाली सकाळी ७ वाजता करी रोड ब्रिज (प) येथून गोल्डमोहर गिरणीवर गिरणी कामगारांचा मोर्चा जाणार आहे.

याच मोर्चाकरीता जनजागृती करण्यासाठी जन आंदोलन मंचतर्फे आज सायंकाळी गणेश टॉकीज इमारत, लालबाग येथील कार्यालयापासून सायंकाळी ६ वाजता भव्य मोटारसायकल रॅली आयोजित करण्यात आली होती. मंचचे अध्यक्ष रोहित पांडे यांनी सांगितले की, 'या रॅलीमध्ये २४ फेब्रुवारी रोजीच सर्व संबधित पोलीस स्थानके व वाहतूक विभागाला लेखी माहिती कळविण्यात आली होती. मात्र, वाहतूक विभागाने इतक्या दिवसांनंतर आज रॅलीच्या दिवशी सकाळी पत्र पाठवून रॅलीला परवानगी नाकारली. हा अन्याय आहे. पण परवानगी नाकारल्याने आजची रॅली आम्हाला नाईलाजाने अगदी ऐनवेळी रद्द करावी लागली.'

## नाशिकची सत्ता घालविणारी शिवसेनेची जिल्हा कार्यकारिणी बरखास्त

नाशिक, ता. २९ - महानगरपालिका निवडणुकीत शिवसेनेचा झालेल्या पराभवाची गंभीर दखल घेत उध्दव ठाकरे यांनी आज शिवसेनेची जिल्हा कार्यकारिणीच बरखास्त केली. या उध्दव ठाकरे यांच्या निर्णयामुळे पदाधिकाऱ्यांमुळे एकच खळबळ उडाली असून शिवसैनिकांनी मात्र ठाकरे यांच्या निर्णयावर समाधान व्यक्त केले आहे.तिकीट वाटपात झालेला गोंधळ, पैसे घेऊन केलेले तिकीट वाटप आणि ढासळलेली प्रचार-यंत्रणा यामुळेच शिवसेनेचा फज्जा उडाल्याने गेल्या काही दिवसांपासून शिवसैनिकांमध्ये पदाधिकाऱ्यांच्या विरोधात संतापाची प्रचंड लाट निर्माण झाली होती.

संपर्कप्रमुख अरविंद सांवत, जिल्हाप्रमुख सुनील बागूल, महानगरप्रमुख अर्जुन टिळे यांनी तिकीटवाटपात मोठ्या प्रमाणावर गोंधळ केला होता. यावेळी पैसे घेऊन तिकिटे वाटल्याचा आरोपही पदाधिकाऱ्यांवर होत होते.लायकी नसलेल्यांना उमेदवारी दिल्याने तसेच इतर पक्षाचा उमेदवार निवडून यावा, यासाठी काही ठिकाणी सेटिंग करत हेतूपुरस्कर दुबळा उमेदवार दिल्याने तर शिवसैनिकांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली होती. या सर्व घटनांची माहिती ठाकरे यांच्यापर्यत गेली होती. एबी फॉर्मचे वाटप शिवसेना कार्यालयातून न करता 'कलश' सोसायटीमधून केले गेल्याने त्यावेळी उमेदवारांनीही संताप बोलून दाखविला होता.या सर्व घटनाक्रमांची गंभीर दखल घेत आज उध्दव ठाकरे यांनी जिल्हा कार्यकारिणीच बरखास्त केली. पदाधिकाऱ्यांविरुध्दच नव्हे; तर उमेदवार निवडून आणण्यात अपयशी ठरलेल्या लोकप्रतिनिधीवरही कारवाई व्हावी, अशी शिवसैनिकांची मागणी आहे.

## ना.विलासराव देशमुख यांना दिलासा
## सहआरोपी करा! कोर्टाने अर्ज फेटाळला

मुंबई, बुधवार- महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख यांना दिलासा मिळाला आहे. कोट्यवधी रुपयांचा बनावट मुद्रांक घोटाळा झाला. याप्रकरणी ना.विलासराव देशमुख यांना सहआरोपी करावे, असा अर्ज करण्यात आला. सत्र न्यायालयात हा अर्ज फेटाळण्यात आला आहे.

तेलगी याने कबुलीजबाब दिला आहे. या जबाबामध्ये विलासराव देशमुख यांचे नाव घेण्यात आले, असे अर्जदाराचे म्हणणे होते. त्यावर न्यायालयात सुनावणी झाली.

## अभिनेता फरदीन खान याची कोकेन खटल्यातून सुटका

मुंबई, बुधवार - विख्यात अभिनेता फिरोज खान यांचा पुत्र अभिनेता फरदीन खान याच्यावर चाललेला कोकेन खरेदीचा आणि सेवनाचा खटला अखेर आज ११ वर्षांनंतर बंद करण्यात आला. फरदीन खान हा सरकारी सुधारगृहात व्यसनमुक्तीचे धडे घेत असून त्याला सुधारण्याची संधी म्हणून त्याच्यावर चालू असलेला अमली पदार्थ सेवनाचा खटला न्यायालय बंद करत आहे, असा आदेश सत्र न्यायालयाचे न्यायाधीश जी.एस.सानप यांनी आज दिला. २००१ मध्ये फरदीन खान याला १ ग्रॅम कोकेन खरेदी करताना वांद्रे येथे अटक करण्यात आली होती.




## कापसाच्या बोंडाला भाव मिळत नाही म्हणून शेतकरी वळला अफूच्या बोंडाकडे!

### सरकारच बनवतेय शेतकऱ्याला गुन्हेगार- सदाभाऊ खोत



**भाग्यश्री फोडकर**

मुंबई, बुधवार- ऊस, कापूस, कांदा उत्पादन शेतकऱ्यांना सरकार योग्य भाव मिळवून देत नाही. धान्य आयात करून सरकार शेतकऱ्यांच्या धान्यांचे भाव पाडते. शेतकऱ्याला कोणतेही पीक घेणे परवडत नाही. त्यामुळेच शेतकरी अफूच्या शेतीकडे वळला. शेतकऱ्याला गुन्हेगार बनविण्यास सर्वस्वी सरकारची शेतकरीविरोधी धोरणे जबाबदार आहेत, असे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे सरचिटणीस सदाभाऊ खोत यांनी 'नवाकाळ'शी बोलताना सांगितले.

▶ पुढील मजकूर पान ८ वर

**९ मार्चला पुण्यात मोर्चा**

अफूचे पीक काढायला सरकारने मान्यता द्यावी, यासाठी शेतकरी संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. पुण्यात ९ मार्च रोजी कृषी विद्यापीठावर शेतकरी मोर्चा काढणार असून मराठवाड्यात अफू परिषदेचे आयोजन काही शेतकरी संघटना करणार आहेत.

लैंगिक संबंधांबाबत पुढाकार घेण्याचे प्रमाण कॉलेजवयीन तरुण-तरुणींमध्ये वाढत आहे. शास्त्रोक्त माहिती नसतानाही तरुण पिढी लैंगिक संबंधांमध्ये पुढचे पाऊल टाकते. नैतिकतेच्या कालच्या कल्पना आज मागे पडत असल्या तरी लैंगिक संबंधांची नेमकी माहिती न घेता शरीरसंबंध प्रस्थापित केल्यास अनेक गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. या समस्या संपूर्ण आयुष्यालाच बट्टा लावू शकतात.



# लैंगिक संबंधांची शास्त्रीय माहिती हवीच

आरोग्यमंत्र
डॉ. ए. कुमार

महानगरातल्या तरुण-तरुणींच्या लैंगिक समस्या कोणत्या प्रकारे वाढत आहेत किंवा आकार घेत आहेत हे समजून घेण्याची संधी अनेकदा मिळते. गेल्या काही दिवसांमध्ये तर अशा प्रकारची अनेक उदाहरणे समोर आली. त्यातल्या त्यात तरुण जोडपी विवाह न करताच शरीरसंबंधांसाठी धजावल्याचे आवर्जून पाहायला मिळाले. वास्तविक पाहता, अशा प्रकारचे वर्तन योग्य नाही; परंतु बदलत्या काळाचा महिमा अपरंपार असतो, असे म्हणतात. त्याचीच चुणूक पाहायला मिळत असते. अलीकडे नैतिकतेच्या कल्पनाही वेगाने बदलत आहेत. कारकिर्दीचा कालावधी लांबल्यामुळे आणि एकूणच नोकरीत स्थैर्य प्राप्त झाल्याशिवाय लग्न करायचे नाही, असे ठरवल्यामुळे बऱ्याच तरुण-तरुणींमध्ये लैंगिक संबंधांबाबत आवश्यक तो संयम बाळगला जात नाही. साहजिकच, त्यांच्या समस्या निर्माण होतात आणि नियोजित वेळेपूर्वीच एखादी तरुणी गरोदर राहणे किंवा तरुणाला एड्‌सचा संसर्ग होणे असे प्रकार पाहायला मिळतात.

मुळात, संयम पाळून किंवा इतर विषयांमध्ये मन गुंतवून तरुणपिढीने हा प्रश्न सोडवायचा प्रयत्न केला पाहिजे. एकदा शिक्षणाचा आणि नोकरीचा प्रश्न सुटला की, संपूर्ण आयुष्य या पिढीच्या हाती असतंच. त्यामुळे तिने लैंगिक संबंधांबाबत थोडे संयमी असणे आवश्यक ठरते. अर्थात ही झाली आदर्शवत कल्पना. आम्हा पुढच्या पिढीतील लोकांचे विचार आजच्या तरुण-तरुणींच्या दृष्टीने कालबाह्य असू शकतात. आजचा काळ 'स्पीड डेटींग'चा किंवा 'लिव्ह इन रिलेशनशिप'चा आहे. त्यामुळे आमची मते काहीही असली तरी तरुण-तरुणींच्या विचारांना हात घालावा लागतो. त्यांना त्या दृष्टीने नेमकेपणाने मार्गदर्शनही करावे लागते; मात्र तरीही तरुणपिढीने असुरक्षित लैंगिक संबंधांचे तोटे समजून घ्यायला हवेत. त्यांना हवी ती माहिती उपलब्ध झाली तरी सुरक्षित लैंगिक संबंधांसाठी ती पुरेशी असतेच असे नाही. किंबहुना, अर्धवट माहितीतून शरीरसंबंध ठेवले गेल्यास मोठ्या धोक्यांना सामोरे जावे लागू शकते.

यासंदर्भात प्रातिनिधीक ठरण्याजोगे एक उदाहरण मला अलीकडेच पाहायला मिळाले. एका महाविद्यालयात शिक्षण घेणारे सीमा आणि सनी हे चौकस प्रेमीयुगुल. एकदा हे युगुल त्यांच्या शंकांची उत्तरे मिळवण्यासाठी माझ्या दवाखान्यात आले. त्यांना एकमेकांशी शरीरसंबंध ठेवण्याची इच्छा होती; मात्र शरीरसंबंध कसा घडून येतो आणि गर्भधारणा टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात यासंदर्भात त्यांना फारशी माहिती नव्हती. अशा विषयाबाबत मार्गदर्शन घेण्याची उत्कंठा त्यांच्यात आढळल्याने मी चकीत झालो. महाविद्यालयीन तरुण-तरुणींमध्ये दिवसेंदिवस लैंगिक संबंध ठेवण्याविषयी ओढ वाढत असल्याचे चित्र दिसत आहे. आजची युवा पिढी विवाहापूर्वीच लैंगिक संबंधांचा अनुभव घेऊ इच्छिते. पाश्चिमात्यांच्या अंधानुकरणामुळे अशा प्रकारची वृत्ती बळावत चालली आहे. समाजात वावरताना लैंगिक क्रियेबद्दल उत्सुकता निर्माण करणारे वातावरण सातत्याने आसपास पाहायला मिळत असल्याने असे घडत असावे.

विवाहापूर्वी शरीरसंबंध ठेवण्याची अनेक कारणे आहेत. प्रसिद्धीमाध्यमातून झळकणारी उत्तान दृश्ये, इंटरनेटवर उपलब्ध असलेले साहित्य आणि एसएमएसवरील अश्लील संदेशांची देवाणघेवाण ही त्यापैकी काही कारणे. त्यामुळे अलीकडे विवाहापूर्वी शरीरसंबंध ठेवणे गैर नाही असा विचारप्रवाह रुढ होत आहे. निसर्गत:च मुलामुलींना परस्परांविषयी आकर्षण वाटत असते. याशिवाय मित्रांकडून मिळालेली कामजीवनाची अपुरी माहिती, वर्तमानपत्रे, फॅशन शोच्या नावाखाली वाहिन्यांवर चाललेला धांगडधिंगा, अश्लील साहित्य, चित्रपट इत्यादींमुळे नवतरुणांच्या कामभावना उद्दीपित होतात. यातून नवयुवकांचे विवाहापूर्वीच शरीरसंबंध ठेवण्याचे प्रमाण वाढत आहे. आपली प्राचीन संस्कृती लैंगिकतेच्या विरोधात नव्हती; मात्र त्याकाळी काही मर्यादा पाळल्या जात. योग्य वयात, योग्य पद्धतीने जोडीदाराची निवड करून विवाहानंतर लैंगिक संबंध प्रस्थापित करणे शिष्टसंमत असे. परंतु आज वयाचे किंवा समाजाचे बंधन न पाळता अनेक तरुण-तरुणी लैंगिक संबंध ठेवताना दिसत आहेत. अशा संबंधांमुळे चोरटे सुख मिळत असले तरी त्यातून गुप्तरोग, एचआयव्हीची लागण, गर्भधारणा यासारख्या गुंतागुंतीच्या समस्या उद्‌भवण्याची शक्यता असते.

अशा वेळी कुमारवयीन मुलामुलींचे वडील महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात. पौगंडावस्थेत मुला-मुलींमध्ये हार्मोन्सच्या बदलामुळे परस्परांविषयी आकर्षण निर्माण होते. त्यांच्यात मैत्री होत असेल तर त्यास विरोध करू नये. मात्र त्यांच्यावर लक्ष ठेवावे. मुलीला पाळी येण्याच्या वयात आईकडून लैंगिक संबंध, गर्भारपण आदी विषयांवर माहिती मिळणे आवश्यक आहे. अनेकदा पाळीच्या निमित्ताने वयात आलेल्या मुलीला आई लैंगिक क्रियांविषयी माहिती सांगताना आढळते. ही माहिती दिल्याने वयात येणाऱ्या मुली आपल्या मित्रांशी काळजीपूर्वक वागतात. शरीरसंबंध ही नैसर्गिक प्रेरणा आहे. अन्न, वस्त्र, निवारा या प्रमुख गरजांप्रमाणे शरीरसंबंध हीदेखील मानवाची एक शारीरिक गरज आहे; परंतु असे शरीरसंबंध घडून येण्यापूर्वी मुलींच्या जननेंद्रियाची पूर्ण वाढ होणे आवश्यक असते. लहान वयात गर्भारपण लादले गेल्यास तरुणींची शारीरिक वाढ खुंटते. दुसरीकडे तरुणांनी त्यांचे शिक्षण पूर्ण करुन कारकिर्दीत स्थिरावल्यानंतर लग्न करणे अभिप्रेत आहे. विवाहापूर्वी कामक्रिडेत भाग घेतल्यास त्यांच्या एकाग्रतेवर परिणाम होऊन एकूण कारकीर्द धोक्यात येण्याचा संभव असतो. त्यामुळे 'आधी लगीन कोंढाण्याचं' या धर्तीवर तरुण-तरुणींनी त्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे तसेच कारकीर्दीकडे लक्ष पुरवणे आवश्यक आहे. विशिष्ट वेळ येताच विवाह पार पडून शरीरसुख मिळवण्याची संधी उपलब्ध होणार आहे; मात्र त्यासाठी लग्नापूर्वीच्या शरीरसंबंधांचा फसवा आणि जीवघेणा शॉर्टकट टाळायला हवा.

अधिक माहितीसाठी संपर्क : कायाकल्प इंटरनॅशनल, मुंबई. दूरध्वनी (९५२२) २८०५३४३४ / २४३३३४३४.

# शेतकऱ्यांची आंदोलने चिरडून शाई धरणाचे काम सुरू

मुरबाड, ता. २९ – धरणच नको म्हणताच शेतकऱ्यांची आजपर्यंतची धरण विरोधी आंदोलने चिरडून शाई धरणाचे काम वेगाने सुरू झाले आहे. शेतकऱ्यांच्यावतीने न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना पोलिसांचे सुरक्षाकवच घेऊन धरणाच्या ठेकेदाराने वेगाने काम सुरू करून शेतकऱ्यांच्या भावना चिरडल्या आहेत.

मुरबाड-शहापूर तालुक्याच्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर या धरणाचे काम सुरू झाल्याने शासनाचे आधी पुनर्वसन मग धरण या धोरणाचीही गळचेपी केली आहे. या धरणामुळे मुरबाड-शहापूर तालुक्यातील ५२ गावांनी विरोध दर्शविला आहे. या धरणाऐवजी पर्यायी छोटे धरण बांधण्याचा पर्याय संघर्ष समितीने शासनास दिला होता. यावर विचार करणार असल्याचेही सांगण्यात येत होते मात्र सर्व थोतांड असल्याचे समोर आले असून राजकीय बळावर शेतकऱ्यांच्या भावनांशी सरकार खेळत असल्याच्या प्रतिक्रिया शेतकरी देत आहेत.

स्थानीय राजकीय लोकांना हाताशी धरून युध्दपातळीवर यांत्रिक सामग्रीच्या सहाय्याने भरावाचे काम सुरू आहे. सध्या दीडशे मशिनरी, पोकलेन डंपर, ट्रॅक्टरच्या सहाय्याने काम सुरू असून शासकीय अधिकारी मात्र काम सुरू नसल्याची दिशाभूल करत आहेत. परिसरातील शेतकरी शासनाच्या व राजकीय दबाव तंत्राच्या विळख्यात सापडले असून आपण उद्‌ध्वस्त होणार असून शासन शेतकऱ्यांऐवजी ठेकेदाराला प्रोत्साहित करून राजकीय फायदा घेत असल्याच्या प्रतिक्रिया शेतकरी देत आहेत.

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत विरोधी पक्षाचे अस्तित्व न दिसल्याने सत्तेच्या बळावर धरणाचे काम वेगात सुरू असून पुढील व्यूह रचनेसाठी शेतकरी तयारीला लागले आहेत.

## श्रीसिध्दिविनायकास अर्पण केलेल्या अलंकारांचा लिलाव

मुंबई, बुधवार – श्रीसिध्दिविनायकास भक्तांनी अर्पण केलेल्या सोन्याच्या अलंकारांची (श्रीगणेश प्रतिमा, दुर्वा, मोदक, अंगठ्या, सोन्याच्या साखळ्या, लॉकेट्स छत्री इ.) रविवार ४ मार्च या दिवशी सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० या वेळेत जाहीर लिलावाने विक्री करण्यात येणार आहे. लिलाव करण्यात येणाऱ्या अलंकारांपैकी काही अलंकार मंदिराच्या आवारात प्रदर्शनार्थ ठेवण्यात येणार आहेत. जाहीर लिलाव मंदिराच्या सभा मंडपात करण्यात येणार आहे. लिलावासंबंधीचे सर्व अधिकार न्यासाने राखून ठेवलेले आहेत. श्रीसिध्दिविनायकाच्या सर्व भक्तांनी या लिलावात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे न्यास व्यवस्थापन समितीने आवाहन केलेले आहे.

## रत्नागिरी जिल्ह्यात कॉंग्रेसचे राजीनामा सत्र सुरूच

रत्नागिरी, ता. २९ – रत्नागिरी जिल्ह्यात कॉंग्रेसमध्ये राजीनामा सत्र सुरू झाले असून, तालुकाध्यक्षांच्या रूपाने एकेक मोहरे पणाला लागत आहेत. लांजा तालुकाध्यक्ष शांताराम गाडे यांच्या राजीनाम्यानंतर आता रत्नागिरी तालुकाध्यक्ष नाना मयेकर यांनी पदाचा राजीनामा जिल्हाध्यक्ष रमेश कीर यांच्याकडे दिला आहे. पराभवाची जबाबदारी स्वीकारून राजापूर, गुहागर व अन्य काही तालुक्याचे पदाधिकारीही राजीनामा देण्याच्या तयारीत आहेत. मात्र, पराभवाची जबाबदारी स्वीकारून हे राजीनामासत्र सुरू आहे की, त्याशिवाय अन्य कारण आहे, याबाबतची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. गुहागरचे तालुकाध्यक्ष प्रदीप बेंडल यांच्या तालुक्यातही कॉंग्रेस पराभूत झाल्याने तेही राजीनामा देण्याची शक्यता आहे. राजापूरचे तालुकाध्यक्ष रवींद्र नागरेकर यांच्याबाबत कार्यकर्त्यांतच नाराजी आहे.

## प्रशासकीय मान्यता! चौकशीचे आदेश

सिंधुदुर्ग, ता. २९ – मुंबईस्थित दी बांदा नवभारत शिक्षण प्रसारक मंडळाच्या बांदा येथील खेमराज मेमोरियल इंग्लिश स्कूलमधील बीए.बीएड. महाविद्यालयाला प्रशासकीय परवानगी नसल्याप्रकरणी संतप्त विद्यार्थिनी व पालकांनी प्रशासनातील प्रभारी प्राचार्या सौ. सीमा हडकर यांना धारेवर धरले.

संतप्त बांदावासीयांनी घातलेल्या घेरावामुळे महाविद्यालय प्रशासनाला पोलीस संरक्षण बोलवावे लागले. अखेरीस या प्रकरणी महिला बीए.बीएड. महाविद्यालयाच्या मान्यतेबाबत चौकशीचे आदेश सावंतवाडी नायब तहसीलदार विजय तळेकर यांनी दिल्यानंतर आंदोलक शांत झाले. ही संस्थाध्यक्ष प्रतापराव तोरस्कर व सचिव वायंगणकर हे चालवित असून या महिला बीए.बीएड. महाविद्यालयाला मान्यता असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

## कल्याणमध्ये अनेक विद्यार्थ्यांना मनसेमुळे हॉलतिकीट मिळाले

कल्याण, ता. २९ – कल्याण पश्चिमेतील मोहिंदरसिंग काबुलसिंग महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांना परीक्षेचे हॉलतिकीट मिळवून देण्यासाठी मनसे विद्यार्थी सेनेच्या शिष्टमंडळाने महाविद्यालय व्यवस्थापकांशी ४ तास चर्चा करून तोडगा काढला. सदर चर्चेत हॉलतिकीट देण्याचे आश्वासन मनसे विद्यार्थी सेनेला व्यवस्थापकांनी दिल्याने विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा प्रश्न अखेर मार्गी लागला.

येत्या १ तारखेपासून प्रथम व द्वितीय वर्ष पदवी परीक्षा महाविद्यालयात सुरू होत आहेत. मात्र महाविद्यालयातील काळ्या यादीतील विद्यार्थ्यांना व्यवस्थापकांनी हॉलतिकीट न देण्याचा निर्णय घेतला होता. ही बाब मनसेच्या विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष कौस्तुभ देसाई यांना कळताच त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह महाविद्यालयाचे विश्वस्त दलबीर सिंग यांच्याशी चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या काही चुका असल्या तरी देखील त्यांना परीक्षेला बसण्यापासून वंचित ठेवता येणार नाही.

त्यांना हॉलतिकीट उपलब्ध करून द्यावे अशी मागणी विद्यार्थी सेनेने लावून धरताच महाविद्यालयाच्या व्यवस्थापकांनी हॉलतिकीट देण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## विहिरीत पडून शाळकरी मुलीचा मृत्यू

अकोले, ता. २९ – विहिरीत पडल्याने नववीत शिकणाऱ्या शाळकरी मुलीचा मृत्यू झाल्याची घटना अकोले (जि. नगर) तालुक्यातील धामणगाव आवारी येथे घडली. नेहा भागवत आवारी असे या मुलीचे नाव आहे. शाळा सुटल्यावर आईला मदत म्हणून पाणी भरण्यासाठी ती विहिरीवर गेली होती. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## टेलिफोन अदालतीमध्ये ग्राहकांचा संताप दूरसंचार प्रबंधकांना धारेवर धरले

सिंधुदुर्ग, ता. २९ – बीएसएनएल या सरकारी दूरसंचार कंपनीच्या मोबाईल सेवेचे वाजलेले तीनतेरा, अधिकाऱ्यांचे सेवेकडे दुर्लक्ष केल्याच्या निषेधार्थ आणि 'लोक अदालत' जनतेसाठी असून ती पुन्हा घ्यावी, या मागणीसाठी कुडाळ येथील टेलिफोन अदालतीमध्ये सिंधुदुर्ग जिल्हा दूरसंचार प्रबंधक प्रभाकर पाटील यांना संतप्त ग्राहकांनी धक्काबुक्की करून धारेवर धरले. टेलिफोन अदालतीमध्ये जिल्हा मुख्य लेखापाल एस.बी. सावंत मोबाईल विभागाचे प्रमुख शिंपी व अन्य अधिकारी उपस्थित होते. बीएसएनएलच्या मोबाईल सेवेतील दोषांमुळे ग्राहकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. मोबाईल सेवेत सुधारणा केल्याशिवाय अधिक मोबाईल सीमकार्डे वितरीत केली जात असल्यामुळे रेंजचे ट्रॅफिक जाम होते. बऱ्याच वेळेला मोबाईल लागत नाही. तर अनेक वेळेला रिंग झाली असे वाटते, मात्र संबंधित ग्राहकाला त्याच्या मोबाईलवर नंबर्स जात नाही असे प्रकार होत असल्यामुळे या सर्व तक्रारींचे समाधान करण्यासाठी पुन्हा लोक अदालत घ्यावी, अशी मागणी ग्राहकांनी केली. ही मागणी नामंजूर केल्याने संतप्त ग्राहकांनी जिल्हा दूरसंचार प्रबंधकांना कोंडीत पकडले.

## अफूची शेती करण्यास शासनाचे धोरण कारणीभूत

सेलू, ता. २९ – शेती मालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव द्यावा ही मागणी सुमारे ५० वर्षांपासून शेतकरी संघटनेने लावून धरली आहे. परंतु केवळ निवडणुकांपुरते शेतकऱ्यांना गोंजारणाऱ्या सरकारने अक्षरश: त्यांना देशोधडीला लावले आहे. त्यामुळेच शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची पाळी आली आहे. मग अशा शेतकऱ्याने अफूची शेती केल्यास बिघडले कुठे? शिवाय याला शासनाचे धोरणच कारणीभूत असल्याचे शेतकरी संघटनेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य किशोर जोशी यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केले. ते म्हणाले की, विजय मल्ल्याही स्वत:च्या फायद्यासाठी दारू निर्मिती करतो. केव्हाही दारू ही आरोग्यास घातकच आहे. तरी याचे उत्पन्न करणाऱ्या मल्ल्यांचा शासन दरबारी उदो उदो होतो. असे कारखानदार समाजात व सरकार दरबारी प्रतिष्ठित मानले जातात. असा वेगळा न्याय कशासाठी? अंगात धमक असणाऱ्या शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्यापेक्षा जर आपल्या शेतात परवडणारे पीक म्हणून अफूची शेती केली तर त्यांची धरपकड होते. त्यांना अपमानित करण्यात येते. शिवाय सरकारने शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या मागणीकडे नेहमीच पाठ फिरविली आहे. शेतीमाल शेतकऱ्यांच्या घरात येऊन पडला की, त्याचे भाव हमखास पडण्याचे प्रकार होतात. तर कधी निर्यात बंदीचा अटकाव केला जातो. अशा परिस्थितीत सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडते, आंध्र प्रदेशातील शेतकऱ्यांनी सरकारच्या अशा धोरणाला कंटाळून लाखो एकर जमीनच पडीक ठेवली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडे अफू किंवा गांजाची शेती करण्याशिवाय पर्यायच नाही.

## वानराच्या हल्ल्यात सातजण जखमी

परभणी, ता. २९ – टाकळ कुंभकर्णी येथे पिसाळलेल्या वानराने अचानक लोकवस्तीवर हल्लाबोल केला. यामध्ये ७ जण गंभीर जखमी झाले आहेत. वानराच्या दहशतीमुळे परिसरात घबराट पसरली आहे. याप्रकरणी वनखात्याकडे तक्रार करूनही अद्यापही वानराला पकडण्यात आलेले नाही.

## जिल्हा कार्यालयातून तीन संगणक चोरीला

नाशिक, ता.२९– नाशिक शहरात बोगस मतदार नोंदणीचे प्रकरण ताजे असतानाच आता जिल्हा कार्यालयातून तीन संगणक गायब झाले आहेत. ज्या संगणकामध्ये बोगस मतदारांची नोंदणी झाली होती ते सर्व संगणक अचानक गायब झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. दरम्यान, बोगस मतदार यादीच्या घोटाळ्यात माझीही चौकशी करा, मी चौकशीला सामोरे जाण्यास तयार आहे. असे या प्रकरणावर प्रकाशझोत टाकणारा कन्हैय्या परदेशी याने सांगितले.

## पत्नीला जखमी केले, पतीस अटक

अकोले, ता. २९ – दारूच्या नशेत तर्र झालेल्या पतीने पत्नीला शिवीगाळ केली, लवकर जेवायला वाढ म्हणून रागाच्या भरात सांडशी (पक्कड) फेकून मारून पत्नीला जखमी केले. पत्नीच्या तक्रारीवरून पतीला अटक करण्यात आली ही घटना अकोले (जि.नगर) तालुक्यातील खिरविरे येथे घडली. अकोले पोलिसात याची नोंद झाली आहे.

# पाणीपट्टी करात भरमसाट वाढ

## दापोलीकरांच्या माथी करवाढीचा बोजा

दापोली, ता. २९ – दापोली नगरपंचायतीच्या झालेल्या २०१२-१३च्या अर्थसंकल्पीय बैठकीत सत्ताधाऱ्यांनी पाणीपट्टीच्या करात वाढ करण्याचा निर्णय घेतला. तब्बल ४०० रुपयांची वाढ करत ही वाढ ८०० रुपयांवरून १२०० रुपये इतकी करण्यात आली आहे.

या करवाढीला शिवसेना-भाजपाच्या नगरसेवकांनी शहरवासीयांना पाणीपुरवठा सुरळीत झाल्यानंतर करवाढीची चर्चा करा, असे सांगत करवाढीला सभागृहात विरोध नोंदवला. सत्तेत राहून आम्ही सत्तेत सहभागी नाही. असे सांगत मागची सभा रद्द करणाऱ्या मनसेने यावेळी आपला सत्ताधर्म पाळत राष्ट्रवादीच्या सत्ताधाऱ्यांजवळ पुन्हा घरोबा जुळवल्याचे चित्र सभागृहात पाहायला मिळाले. आरोग्यसेवा, पाणीपुरवठा व अन्य निरनिराळ्या करांमध्ये अपेक्षित वाढ सुचवणाऱ्या या अर्थसंकल्पाच्या बैठकीत शिवसेना, भाजपा व आरपीआय या महायुतीच्या सदस्यांनी करवाढीला आपला विरोध नोंदविला. अशा स्वरूपाची करवाढ करताना आपण नागरिकांना काय सुविधा देतोय या सगळ्यांचा आढावा घेऊन करवाढ सुचवणे व त्यावर विचार करणे योग्य होईल.

अशा स्वरूपाचे मत भाजपाचे संजय सावंत यांनी मांडले. सुरुवातीलाच शहरातील पाणीपुरवठा सेवेवर करवाढीचा विषय सभागृहात चर्चेला आला. प्रशासनाकडून पाणीपुरवठा योजना तोट्यात असल्याचे कारण देत शासनाच्या धोरणानुसार ना नफा ना तोटा या तत्त्वावर पाणीपुरवठा योजना चालवण्याकरिता किमान १८०० रुपये पाणीपट्टी करणे आवश्यक असल्याचे मत देण्यात आलेल्या टिपणीत व्यक्त करण्यात आले होते. या विषयावर नगराध्यक्षा विनिता शिगवण यांनी पाणीपट्टी वाढ आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले, मात्र या विषयाला सेनेचे गटनेते जावेद मणियार यांनी विरोध दर्शविला.

## मनमाड पालिकेचा शिलकी अर्थसंकल्प

मनमाड, ता. २९ – मनमाड नगरपालिकेचा २०१२-२०१३चा ३ लाख ५१ हजार ७५ रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प नगराध्यक्ष राजेंद्र अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष सभेत मंजूर करण्यात आला. २६ कोटी ६५ लाख १२ हजार ४७५ रुपयांच्या या अर्थसंकल्पात २६ कोटी ६४ लाख ६० हजार ५०० रुपये वर्षभरात खर्च दाखविण्यात आला आहे. कोणतीही करवाढ नसलेल्या अर्थसंकल्पामुळे नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

नगरपालिकेच्या सभागृहात झालेल्या या महत्त्वाच्या विशेष सभेला ३२ पैकी २० नगरसेवक उपस्थित होते. यावेळी मुख्य लेखपाल सतीश जोशी यांनी २०१२-१३चा अर्थसंकल्प सभागृहात मांडला. यावेळी जोशी यांनी शासनाकडून सहायक अनुदानापोटी १२ कोटी रुपये पालिकेला मिळणे अपेक्षित असल्याचे सांगितले. यावेळी उपनगराध्यक्षा सुषमा नलावडे, नगरसेवक प्रवीण पाटील, बबलू पाटील, प्रवीण नाईक, संतोष बळीद आदी उपस्थित होते.

## शाहूवाडीत सापडली अफूची शेती

कोल्हापूर, ता.२९– जिल्ह्यातील शाहूवाडी तालुक्यामधील शेतामध्ये अफू या विषारी पिकाची लागवड करण्यात आल्याचे आढळून आले आहे. ऊस शेतीमध्ये अफूची शेती घेण्यात येत असल्याचे उघड झाले आहे. याप्रकरणी अफूचे पीक ताब्यात घेण्यात आले आहे. अफूच्या पिकाला काळ्या बाजारात मोठी किंमत मिळते. त्यामुळे शेतकरी अफूचे पीक घेण्याचा शॉर्टकट मार्ग स्वीकारत असल्याचे या पोलिसांच्या छाप्यामध्ये स्पष्ट झाले आहे.

## विहिरीत पडून इसमाचा मृत्यू

रत्नागिरी, ता. २९ – खोदाई सुरू असणाऱ्या विहिरीमध्ये ५६ वर्षीय अनोळखी इसम मृत्युमुखी पडल्याची घटना लांजा तालुक्यातील वनगुळे येथे घडली. रात्री उशिरापर्यंत त्यांची ओळख पटवण्याचा प्रयत्न पोलीस करत होते. जवाहर योजनेंतर्गत विहीर खोदाई सुरू आहे. जवळ-जवळ १५ फुटांपर्यंत खोदाई झाली आहे. ही व्यक्ती जात असताना विहिरीचा अंदाज न आल्याने विहिरीत पडली. विहिरीमध्ये तीन ते चार फूट पाणी असल्याने, पाण्यामध्ये बुडून अथवा उंचावरून पडल्याने त्यांचा मृत्यू ओढवला असावा.

## जाहीर सूचना

**आम जनतेस** सूचित करण्यात येत आहे की आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात विस्तृतपणे वर्णिलेल्या शेतजमिनीच्या स्थावर मालमत्तेचे संपादन करण्याचे कबूल केले आहे व याकरिता आम्ही सदर स्थावर मालमत्तेच्या हक्कांची चौकशी करीत आहोत. सदर मालमत्ता ही सध्या रायगडचे **शिवाजी देशमुख**, भारतीय नागरिक पत्ता पी.ओ. तिवरे, तालुका सुधागड, जि. रायगड, **वंदना देशमुख** रायगड येथील भारतीय नागरिक, पत्ता पी.ओ. तिवरे, तालुका सुधागढ, जिल्हा रायगड, **चंद्रकांत राजाराम भौड** रायगड येथील भारतीय नागरिक पत्ता पी.ओ. पाली, तालुका सुधागड, जि.रायगड व **रणजीत रमेश प्रधान** नवी मुंबई येथील भारतीय नागरिक पत्ता ६०४-६०५, ओडेसी केसर हार्मनी, सेक्टर – ०६, खारघर, नवी मुंबई –४१० २१० १२०२ सिद्धीविनायक रेसिडेन्सी, सेक्टर –२०, खारघर, नवी मुंबई – ४१० २१० यांच्या मालकीची आहे.

कोणाही व्यक्तीचा खालील निर्देशित मालमत्तेसंदर्भात वारसा, गहाण, विक्री, भेट, भाडेकरार, भाडेपट्टा, ताबा, धारणाधिकार, अधिभार, न्यास, देखभाल, सुविधाधिकार वा अन्य कोणताही भार वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा वा विक्री वा अन्य कोणत्याही बाबतीत हरकत असल्यास त्यांनी लेखी, कागदपत्रांसह सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून **१४ दिवसांच्या आत** अधोहस्ताक्षरितांना त्यांचे कार्यालयाच्या पत्त्यावर सूचित करावे अन्यथा अशा कोणत्याही दाव्यांच्या संदर्भाशिवाय विक्री व हस्तांतरण व्यवहार पूर्ण करण्यात येईल व काही असल्यास ते अभित्यागित समजण्यात येतील व ते आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

**वरील संदर्भित मालमत्तेचे वर्णन**

गाव कन्सल, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील सर्व्हे/गट क्र. २३ धारक अंदाजे ०-८६-० हेक्टर्स व सर्व्हे/गट क्र. २५ धारक अंदाजे ०-८३-० हेक्टर्स व सर्व्हे/गट क्र. २६ धारक अंदाजे १-१४-८ हेक्टर्स क्षेत्रफळाच्या शेतजमिनीचा भूखंड, ज्याच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत:

| | |
|---|---|
| **सर्व्हे/गट क्र. २३** | पूर्वेस : सर्व्हे/गट क्र. २२ व २७ |
| | पश्चिमेस : सर्व्हे/गट क्र. २४ |
| | उत्तरेस : सर्व्हे/गट क्र. ३० |
| | दक्षिणेस : सर्व्हे/गट क्र. २० |
| **सर्व्हे/गट क्र. २५** | पूर्वेस : सर्व्हे/गट क्र. १७ व १९ |
| | पश्चिमेस : ... नदी |
| | उत्तरेस : सर्व्हे/गट क्र. २६ |
| | दक्षिणेस : ..... नदी |
| **सर्व्हे/गट क्र. २६** | पूर्वेस : सर्व्हे/गट क्र. २४ |
| | पश्चिमेस : सर्व्हे/गट क्र. ३४ व ३६ |
| | उत्तरेस : सर्व्हे/गट क्र. ३३ |
| | दक्षिणेस : सर्व्हे/गट क्र. २५ |

दि. ०१ मार्च, २०१२

**मे. बिलावाला अॅन्ड कं.**
खरेदीदारांचे वकील व सॉलिसिटर्स
करीम चेंबर्स, २ रा मजला,
अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट,
मुंबई – ४०० ०२३.

रामेश्वर मिडिया

# मुकद्दर का सिकंदर

राजभोग

भारत कदम

मुंबई ही मायानगरी आहे. मुंबई ही मनात उत्तुंग स्वप्ने जागविणारी स्वप्ननगरी आहे. मुंबईत गेले की उराशी बाळगलेली स्वप्ने साकार होतात. मुंबईत रंकाचा राव होतो आणि हौसला बुलंद असेल तर फुटपाथवरचा माणूस शहेनशहा होतो. मनात जिद्द असेल तर शाहरूख खान होतो. हिम्मत, रग व धाडस असेल तर दाऊदचा डॉन होतो. मिळेल तो मार्ग अनुसरण्याची हिंमत असेल तर कांदे-बटाटे विकणाऱ्याचा कृपाशंकर सिंह होतो. अंगात कला असेल तर शंकर-जयकिशन व नौशाद बनतो. फक्त आखून दिलेले काम करतो तो आयुष्यभर गिरणी कामगार राहतो. मुंबई ही लाखो माणसांची कोट्यवधी स्वप्ने साकार करणारी आणि त्यासाठी हजारो मार्ग दाखविणारी जादुईनगरी आहे. मुंबई सर्वांना स्वीकारते, सावरते आणि साकारते. मुंबई ही सापशिडीचा खेळ आहे. ज्याला झटकेपट श्रीमंत व्हायचे आहे तो या खेळाच्या चक्रव्यूहात उडी घेतो. जो यशस्वी होतो तो 'मुकद्दर का सिकंदर' बनतो व जो अयशस्वी होतो तो हाजीअलीच्या भिकाऱ्यांच्या रांगेत बसतो. मुंबईची ही वैशिष्ट्येच लाखो मुंबईकरांची कहाणी बनते. असाच एक भणंग या शहरात आपले भाग्य अजमावयाला आला आणि बघता-बघता या शहराचा शहेनशहा बनला. एकेकाळी दुसऱ्यांच्या कृपेवर जगणारा माणूस इतरांवर कृपा करणारा कृपाशंकर बनला.

आज कृपाशंकर यांची शेकडो कोटींची स्थावर मालमत्ता न्यायालयाने जप्त करण्याचा आदेश दिला आहे. शिक्षणाची खोटी माहिती दिली म्हणून कृपाशंकर सिंह यांची अफाट रणनीती खेळून मिळविलेली आमदारकीही जाण्याची शक्यता आहे. कृपाशंकर मनात म्हणत असतील की, 'कल चमन था आज एक सहेरा हुआ, देखते देखते ये क्या हुआ?' कृपाशंकर सिंह यांच्या पाठी हात धुवून लागल्यागत घटना घडत आहेत. कृपाशंकर सिंह यांच्या उदयास्ताकडे पाहिल्यावर राजेंद्र कृष्ण यांच्या दोन ओळी आठवतात. त्यात गीतकार म्हणतो, 'भूल जा अब ओ मस्त हवा, ओ उडना डाली डाली, जगकी आँख का काँटा बन गयी चाल तेरी मतवाली.'

आज कृपाशंकर सिंह यांचे प्रसिद्धी माध्यमातून दरदिवशी धिंडवडे काढले जात आहेत. एवढ्या २० वर्षांच्या कमी अवधीत शेकडो कोटींची माया जमविली म्हणून त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. या जादुई नगरीच्या सर्व खुब्या अभ्यासून सत्तेची किल्ली लावून गुप्त-सुप्त खजिन्याची तिजोरी खुली केली म्हणून त्यांच्यावर डाका टाकल्याचा आळ घेतला जात आहे. त्यामुळे संपूर्ण कृपाशंकर प्रकरणात फक्त कृपाशंकर या एका व्यक्तीला आरोपी बनवून चालणार नाही. ही झटपट श्रीमंत होण्याची प्रवृत्ती भारतात झपाट्याने का वाढते? याचाही वेध घ्यायला हवा.

अठरा विश्व दारिद्र्यात असलेल्या माणसाला या दलदलीतून वर उठावेसे वाटले तर त्यात काहीही गैर नाही. मात्र आपण वर उठण्यासाठी मार्ग कोणते अनुसरतो यावर सर्व काही अवलंबून असते. कृपाशंकर सिंह यानी राजकीय सत्तेचा शॉर्टकट पत्करला. कारण ज्यावेळी ते मुंबईत खार रेल्वे स्टेशनबाहेर कांदे-बटाट्याचे वाटे लावून विकत होते त्यावेळी त्यांनी मनाला आणि शरीराला रक्तबंबाळ करणारे अनेक अपमान व हल्ले सहन केले होते. लोकांकडून मिळणारी कुत्र्यासारखी वागणूक व गिऱ्हाईकांच्या नजरेतील तुच्छता सर्व स्वप्ने विझवून, कुस्करून व तुडवून टाकीत होती. घरी उपाशीपोटी निजणाऱ्या मुलांकडे पाहून मनात काय कालवाकालव होत असेल? या सर्व हीन-दीन आयुष्यातून वर येण्याचे अनेक मार्ग मुंबईत आहेत. त्यातल्या राजकारणाचा मार्ग कृपाशंकरांनी निवडला.

राजकीय सत्तेचे सोपान गाठायचे असेल तर कुणाचे तरी बोट धरावेच लागते. ते खार-वांद्रे भागातील स्थानिक काँग्रेस नेते जनार्दन चांदुरकर यांच्या कार्यालयातील शिपाई बनले. या शिपाई असण्याच्यावेळी त्यांनी किती अपमान झेलले असतील? किती हाडतूड सहन केली असेल? मात्र त्याचवेळी त्यांना जादूची कांडीही गवसली होती. कूळ, खानदान, शिक्षण, पैसा नसला तरी राजकारणात प्रवेश करता येतो. त्याबद्दल भारतीय लोकशाहीचे त्यांनी मनोमन आभारही मानले असतील. नेत्यांची मर्जी झटपट संपादन करण्याचा राजमार्ग म्हणजे त्याची थुंकी झेलणे व जोडे उचलणे. कृपाशंकर यांनी सत्तेच्या पायऱ्या चढण्यासाठी पदोपदी भेटणाऱ्या अशा किती नेत्यांची थुंकी झेलली असेल आणि किती नेत्यांचे जोडे उचलले असतील याची तुम्ही साधी कल्पना करा मग तुम्हाला कृपाशंकर कुठच्या कुठच्या अग्निदिव्यातून गेले असतील याची कल्पना येईल. मोडेन पण वाकणार नाही, अशा ताठ कण्याच्या मराठी माणसांनी तर कृपाशंकर यांचा उपहास करण्यापेक्षा थोडा विचार करून स्वत:लाच प्रश्न विचारावा की, ही सर्व गुलामगिरी करताना कृपाशंकर नावाच्या माणसाला काहीच यातना झाल्या नसतील?

कृपाशंकर याला गरिबीचे कूळ आणि श्रीमंतीचे मूळ समजले होते. काँग्रेस ब्लॉक कमिटी ते तालुका कमिटी आणि तालुका कमिटी ते जिल्हा कमिटी व पुढे नंतर जिल्हा कमिटी ते मुंबई प्रदेश कमिटी हा चार पायऱ्यांचा प्रवास होता. नेत्यांचे जोडे उचलले की या चार पायऱ्या एकाच उडीत पार होतात. फक्त चिकाटी हवी आणि नेत्यांना काय हवे ते पुरविण्याची हातोटी व कसब एकदा अंगी बाणविले की मग पक्षाची पदे गळ्यात पडतात. कृपाशंकर सिंह यांनी त्यांच्या पक्षातील नेत्यांचा चढता आलेख व सुबत्ता पाहूनच सत्तेच्या बुद्धिबळाचा डाव मांडला. त्यांच्या पक्षातील नेत्यांचे हातखंडेच त्यांनी वापरले. या सर्व प्रवासात त्यांना अवहेलना आणि अपमान सहन करावे लागले असतील. मात्र या सत्तेच्या खेळातील ती पूर्वअट असते हे गणित कृपाशंकरना उमजले होते.

बेसुमार संपत्तीच्या मागे गुन्हेगारीचाच वापर असतो. गुन्हेगारीचा वापर केल्याशिवाय तुम्हाला अमाप संपत्ती कमविता येत नाही हे बलझाक या तत्ववेत्याचे तत्वज्ञान कृपाशंकरजींना बरोबर माहीत होते. त्याचबरोबर या लोकशाहीने या गुन्हेगारीला दिलेले वरदानही माहीत होते. तसेच मानवी स्वभावही माहीत होता. गुन्हेगारीचा वापर केल्याशिवाय अमाप संपत्ती कमविता येत नाही हे जरी खरे असले तरी एकदा का तुम्ही अफाट संपत्ती कमविलीत की लोक तुमची थुंकी झेलायला तयार असतात. हे थुंकी झेलणारे लोक तुम्हाला कधीही विचारत नाहीत की, बाबा ही संपत्ती तू कोणत्या मार्गाने मिळविलीस? त्यांना एकदा का तुम्ही खैरात वाटायला सुरुवात केली. की ते तुम्हालाच 'सन्माननीय' म्हणू लागतात. फक्त कल्पना करा की, कृपाशंकर यांनी आपल्या संपत्तीची खैरात किती जणांना वाटली असेल?

कृपाशंकर सिंह हे या मुंबई नावाच्या मायानगरीच्या अफाट सामर्थ्याचे व किमयेचे एक उदाहरण आहे. असे मुंबईत किमान दोन लाख अब्जोपती आहेत. त्या सर्वांचेच मार्ग तपासायचे तर भोवळ येईल अशा सुरस कहाण्या बाहेर येतील. मग ते चित्रपटातील कलावंत असोत, उद्योगपती असोत, हिरे व्यापारी असोत की व्यावसायिक असोत, सर्वांनीच शॉर्टकट व वाममार्गाचा वापर केलेला असतो. माहितीच्या अधिकारात काही ठराविक व्यक्तींचाच का पिच्छा पुरविला जातो? व्यक्तिगत खुन्नस, आकस की बदला घेण्याच्या भावनेतून हे प्रकार होतात? याचाही विचार करायला हवा.

शेवटी मुंबईचे एकमेव महात्म्य सांगतो. शॉर्टकट मार्गाने मुंबईत प्रत्येक क्षेत्रात यश मिळते हा मुंबईचा जगभर असलेला लौकिक आहे. त्यामुळेच दरदिवशी हजारो लोक मुंबई जिंकायला बाहेर पडतात. मुंबईचा हा लौकिक हाच मुंबईचा प्राण आहे. कृपाशंकर सिंह यांच्यासारखे कर्तृत्ववान' या लौकिकाची साक्ष पटवून देतात. कृपाशंकर सिंह यांच्यासारखे मुकद्दर का सिकंदर बनण्यासाठी हजारो लोक दरदिवशी मुंबईत येत असतात. त्यांना कृपाशंकर यांच्यासारखे लोक द्वीपगृहासारखे भासत असतात. ते त्यांना खुणावत असतात. त्यांच्यासारखे आपणही श्रीमंत होऊ हा विश्वास या स्वप्ने पाहणाऱ्या लोकांना असतो. म्हणूनच माहितीच्या अधिकाराचा ससेमिरा मागे लागला तर स्वप्नांचा चक्काचूर होईल. मग यापुढे कृपाशंकर सिंह यांच्यासारखे सपनों का सौदागर निर्माण होणेच थांबेल. उरतील ते फक्त अहोरात्र घाम गाळणारे गुलाम!

# जळगावचे तापमान ३७ अंशांवर
## संभाव्य पाणीटंचाई निवारणार्थ प्रशासन तयार

### १८६ गावे टंचाईग्रस्त विहिरींचे अधिग्रहण

जळगाव, ता.२९- थंडीत तापमानाचा पारा एकदम खाली गेल्यानंतर उन्हाळ्याची चाहूल लागताच जळगाव जिल्ह्यात तापमान ३७ अंशांवर गेले आहे. तीव्र उन्हाळा पाहता संभाव्य पाणीटंचाईसाठी प्रशासनाने सज्जता केली असून जिल्ह्यात १८६ गावे टंचाईग्रस्त असल्याचे सांगण्यात आले आहे. यात अमळनेर तालुक्यातील सर्वाधिक ३० गावे आहेत.

जळगाव जिल्ह्याने यावर्षी थंडीचा कडाका चांगलाच अनुभवला. गेलेली थंडी दोनदा परत आल्याचा विचित्र अनुभवसुद्धा यंदा आला. मात्र, शिवरात्री जागाच उन्हाचा चटका बसायला लागला आहे. राज्यात दरवर्षी सर्वाधिक तापमान नोंदविल्या जाणाऱ्या या जिल्ह्यात फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यातच तापमान ३७ अंश नोंदविण्यात आले आहे व होळीनंतर उष्णतामानात वेगाने वाढ होणार, हे निश्चित आहे.

उन्हाळा व पाणीटंचाई हे समीकरण ठरलेलेच असल्याने संभाव्य पाणीटंचाईचे संकट पाहता, प्रशासनाकडून टंचाई निवारणार्थ आवश्यक तयारी केली जात आहे. यात खासगी विहिरींचे अधिग्रहण, तात्पुरत्या पाणीपुरवठा योजना तसेच टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणार आहे.

जिल्हा प्रशासनाकडून जिल्ह्यातील १८६ गावे टंचाईग्रस्त असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. यात सर्वाधिक ३० गावे अमळनेर तालुक्यातील आहेत. त्यानंतर जामनेर तालुक्यात २२, भुसावळात २१, मुक्ताईनगर आणि एरंडोल तालुक्यातील प्रत्येकी १७ गावांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे पारोळा आणि धरणगाव तालुक्यातील प्रत्येकी १४, रावेर, पाचोरा व चाळीसगाव तालुक्यातील प्रत्येकी दोन, जळगाव तालुक्यातील १५, बोदवड १३, भडगाव तालुका ४, चोपडा ८, यावल तालुक्यातील ५ गावांचा समावेश आहे.

# रेल्वे अर्थसंकल्पात महाराष्ट्र दुर्लक्षित! -खा. सुळेंची नाराजी

नवी दिल्ली, ता.२९- केंद्रीय रेल्वे मंत्रालयाच्या बैठकीमध्ये महाराष्ट्रातील खासदारांची आज लक्षणीय उपस्थिती होती. मात्र रेल्वेच्या अर्थसंकल्पामध्ये नेहमीच महाराष्ट्र दुर्लक्षित राहात असल्याचा आक्षेप घेत रेल्वे मंत्रालयावर राष्ट्रवादी काँग्रेस नेत्या खा. सुप्रिया सुळे यांनी जोरदार ताशेरे ओढले. यापुढे रेल्वे मंत्रालयाकडून होणारी उपेक्षा अजिबात खपवून घेणार नाही, असा इशाराही यावेळी सुळे यांनी पुढे बोलताना दिला.

# नांदेड विद्यापीठात नवी परीक्षा पद्धत आणणार

नांदेड, ता.२९- नांदेड विद्यापीठामध्ये अगामी शैक्षणिक वर्षात नवी परीक्षा पद्धत अमलात आणली जाईल, असे आश्वासन नांदेड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांनी येथे बोलताना दिले. नव्या परीक्षा पद्धतीमुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्यात वाढ होणार आहे.

# अफूच्या शेतीला मान्यता द्या शरद जोशींची मागणी

कोल्हापूर, ता.२९- राज्यात बंदी घालण्यात आलेल्या अफूच्या शेतीला सरकारने मान्यता द्यावी, अशी अजब मागणी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष शरद जोशी यांनी केली आहे. राज्यात शेतीला योग्य भाव दिला जात नसताना शेतकऱ्यांना किमान अफूची शेती करण्यास तरी राज्य सरकारने परवानगी द्यावी.

राज्यात शेतकऱ्यांना अफूची शेती करण्याची परवानगी दिल्यास त्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करणार नाहीत. शेतकऱ्यांना ही शेती पिकवण्याचा अधिकार दिला जात नसेल, तर शेतकऱ्यांनी हातात बंदुका घेऊन नक्षलवादी व्हावे का? असे उद्गारही जोशी यांनी यावेळी बोलताना काढले.

# धोपावे औष्णिक वीज प्रकल्पाला तीव्र विरोध करण्याचा मुंबईत निर्धार

रत्नागिरी, ता.२९- गुहागर तालुक्यातील धोपावे औष्णिक वीज प्रकल्पाविरोधात धोपावे ग्रामस्थ मंडळ, मुंबई व धोपावे ग्रामस्थांची दादर (मुंबई) येथे सभा झाली. यावेळी प्रकल्पाला विरोध करण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला. धोपावेत होणारा औष्णिक वीज प्रकल्प विनाशकारी असून, या प्रकल्पाला सर्वांनी एकत्र येऊन प्रकल्प घालविण्यासाठी आखणी करण्यात आली.

या प्रकल्पाविरोधात शांततेने व कायदेशीर मार्गाने गावातील एकजूट जागरूक ठेवून प्रकल्प हद्दपार करण्याचे ठरविण्यात आले. तसेच या सभेत गावपातळीवरील सार्वजनिक व सामाजिक विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी चंद्रकांत सावंत, अनंत डावल, लक्ष्मण भेकरे, मोहन डावल, अनिल चव्हाण, रमेश चाळके, अशोक चाळके, वामन पवार, बळवंत पवार, सदा पवार, श्रीकृष्ण कुळे, दीपक कुळे, महेश शिगवण, प्रकाश डावल आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. धोपावे औष्णिक वीज प्रकल्प रद्द करावा, या मागणीसाठी शासन स्तरावर व महाजनकोला पत्रव्यवहार करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच या प्रकल्पाविरोधात धोपावे मुंबई ग्रामस्थ मंडळ व धोपावे ग्रामस्थ मंडळ यांच्या तीन सामूहिक सभा मुंबई येथे यापूर्वी झाल्या आहेत. परंतु आता या प्रकल्पातून १ हजार ९०० मेगावॅट वीजनिर्मितीतून हजारो मेट्रिक टन कोळसा जाळून राख बाहेर पडणार आहे. येथील फळबागा, मत्स्यव्यवसाय, शेतीबरोबरच मनुष्यजीवन, प्राणीमात्रांना दुष्परिणाम सोसावे लागणार आहेत. परंतु आता आपल्या जमिनीत शुद्ध हवेत मोकळा श्वास घेण्यासाठी व्यापक आंदोलन छेडण्याचा निर्धारही या सभेत करण्यात आला. यावेळी गुहागर तालुक्यातील अनेक ग्रामस्थांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

# हिंगोलीत जुगार अड्ड्यावर छापा! ३० लाख रुपये जप्त!

हिंगोली, ता.२९- जिल्ह्यातील वाकोडी येथील एका ठिकाणी मोठ्याप्रमाणात जुगार अड्डा सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी अचानक छापा टाकला. या छाप्यामध्ये पोलिसांनी ३०लाख रुपये रोख अशी रक्कम जप्त केली आहे. जुगार खेळणारी व्यक्ती हे नामवंत राजकारणी यांचे नातेवाईक असल्याचा अंदाज आहे. याप्रकरणी पोलिसांनी जुगार खेळणाऱ्यांविरोधात गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# २५ गावांनी ग्रामसभेचे ठराव करून क्षेत्र पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील करावे

सिंधुदुर्ग, ता.२९- सावंतवाडी व दोडामार्ग तालुक्यातील २५ गावांनी ग्रामसभेचे ठराव मंजूर करून गावातील क्षेत्र पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील करावे, अशी मागणी पश्चिम घाट अभ्यास समितीचे अध्यक्ष डॉ. माधव गाडगीळ यांनी आपल्या अहवालात केली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात 'इको-सेन्सिटिव्ह'साठी पोषक असे समृद्ध पर्यावरण आहे. २५ गावामधील ग्रामसभांनी 'इको-सेन्सिटिव्ह'चे ठराव दिले. त्या बऱ्याचशा गावामध्ये खनिज प्रकल्प प्रस्तावित आहेत. या दोन्ही तालुक्यात खनिज प्रकल्पांच्या हालचाली वाढल्यामुळेच व हालचालीपासून बचावासाठी सदर ठराव घेतले होते. डॉ. माधव गाडगीळ यांनी पश्चिम घाट अहवालात याचा सविस्तर उल्लेख केला आहे. 'इको-सेन्सिटिव्ह' लागू करताना व विकास-प्रक्रिया राबविताना अतिरेक करण्यात येऊ नये हे सर्व करताना लोकभावना सर्वांत महत्वाची आहे. अशी सूचना डॉ. गाडगीळ यांनी अहवालात केली आहे. 'इको-सेन्सिटिव्ह' चे ठराव ज्या २५ गावांनी दिले आहेत. त्या गावामधील 'सेन्सिटिव्ह' चे नियम व अटी कोल्हापूर येथील 'देवराई' या संस्थेने काळजीपूर्वक तयार केल्या आहेत. तसेच या २५ गावामधील काही ग्राम पंचायतीच्या ग्रामसभांचे ठराव अतिशय विचार करण्यासारखे असल्याचेही डॉ. गाडगीळ यांनी या अहवालात म्हटले आहे. काजू, कोकम याशिवाय समृद्ध शेती होण्याजोगे पाण्याचे स्त्रोत गावात उपलब्ध आहेत. परंतु नियोजनाअभावी फक्त पावसाच्या पाण्यावरच शेती अवलंबून असते. गावात समृद्ध शेती करण्यासाठी शासनाकडून योग्य प्रशिक्षण व निधी मिळत नसल्याचा उल्लेखही ग्रामसभेच्या ठरावात आहे. पारंपरिक घरे, विविध फळ-पिके, हिरवीगार जंगले या गावात असून ती पर्यटकांना आकर्षित करू शकतात.


## महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय
## शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१
## निविदा सूचना

महाराष्ट्र पोलीस दलासाठी अत्याधुनिक साधन सामुग्री खरेदी करण्यासाठी दिनांक २३.०२.२०१२ च्या महाराष्ट्र शासन, राजपत्र भाग दोन, पुरवणीमध्ये अटी व नियम इत्यादी दर्शविणारी निविदा सूचना प्रसिध्द करण्यासाठी देण्यात आली आहे. सदर निविदा सूचनेची संक्षिप्त माहिती खालील प्रमाणे आहे :

| अ. क्र. | निविदा क्रमांक | वस्तूंचे नांव | संख्या/ नग | निविदा प्रपत्र किंमत रु. | निविदा पोहोचण्याची दिनांक व वेळ | निविदा उघडण्याची दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोमसं/१७अ/६ १६२/ प्लॅन - मॉड ११-१२/ CPM Portable DFMD/ /११ | Portable DFMD | २५ ± २५% | २०००/- | १५.०३.२०१२ १३.०० वाजेपर्यंत | १५.०३.२०१२ १४.०० वाजता |

**सूचना:-** निविदा प्रपत्र व विनिर्देश महाराष्ट्र पोलीस दलाच्या **www.mahapolice.gov.in** किंवा बृहन्मुंबईच्या **www.mumbaipolice.org** या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. इच्छूक निविदाकारांनी निविदा प्रपत्र व विनिर्देश वेबसाईटवरून डाऊन लोड करून घ्यावेत. निविदा प्रपत्रात वर उल्लेखित केल्याप्रमाणे निविदा शुल्क पोलीस महासंचालक यांचे नावे डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात तांत्रिक लिफाफ्यात सादर करावे. निविदा शुल्क अदा न केलेले निविदा प्रपत्र नाकारण्यात येतील. वेबसाईटवरून डाउनलोड केलेले निविदा प्रपत्र या कार्यालयात स्विकारले जातील.

सर्वच्या सर्व निविदा किंवा एकूणच निविदा प्रक्रिया कोणतेही वेळी कारण न देता रद्द करण्याचा अधिकार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे राखून ठेवण्यात येत आहे. सदरची खरेदी शासनाकडून निधी उपलब्धतेच्या अधीन आहे.

सही/-
(दत्ता ढवळे)
पोलीस उप महानिरीक्षक (तरतूद)
पोलीस महासंचालक यांचकरिता

डीजीआयपीआर/२०११-२०१२/३७७८



## ॲसिडिटी का कोलायटीस?

ॲसिडिटी, अपचन हे अग्नीची 'पचनशक्ती' कमी झाल्यामुळे दिसणारे परिणाम आहेत. घेतलेल्या आहाराचे पचन करून शरीर घटकांमध्ये रूपांतर करणारा भाव म्हणजेच अग्नी होय. या अग्निविकृतीमुळे अजीर्ण /अपचन होणे, बध्दकोष्ठतेचा त्रास, आम्लपित्त, आमांश/आव पडणे, अल्सर, मुळव्याध, भगंदर, कोलायटीस, पित्ताशयातील खडे यांसारख्या तक्रारी सुरु होतात. अशा रुग्णांमध्ये सर्वसाधारणपणे अन्न बिलकूल घ्यावेसे न वाटणे जेवल्यानंतर पोट गच्च होणे, गॅसेस होणे, करपट ढेकर येणे, छातीत व घशामध्ये जळजळ, तोंड कडू/ आंबट होणे, मळमळ, उलट्या होणे. पित्ताची उलटी होणे, पोटात दुखणे, मलावष्टंभ किंवा पोट साफ न होणे, बेचैनी, शौचास चिकट होणे, शौचाच्या वेळी पोटात कळ येणे, एकदा जाऊन आले तरी पुन्हा जावेसे वाटणे यांसारखी लक्षणे दिसतात. आय.बी.एस., कोलायटीस, अल्सरेटिव्ह कोलायटीस यांचा 'ग्रहणी' या व्याधीमध्ये समावेश होतो. यामध्ये 'ग्रहणी' या अवयवाची अन्नातील शरीरोपयोगी भाग शोषन घेण्याची प्रक्रियाच व्यवस्थित होत नाही. यामध्ये कधी जुलाब, तर कधी मलावरोध असणे किंवा सतत जुलाब होणे, जेवल्यावर शौचास येणे, सतत तोंड येणे, ताप असणे, अशक्तपणा भरपूर असणे, अंग जड वाटणे, पोटात दुखणे, आव पडणे, मळमळ, उत्साह नसणे, कधी-कधी शौचावाटे रक्त पडणे अशी लक्षणे दिसतात. योग्य ते निदान न झाल्यामुळे व तात्पुरते उपचार करत राहिल्यामुळे वर्षानुवर्षे पोटाच्या तक्रारी असणारे बरेच रुग्ण दिसतात. अग्निविकृती हेच यामागचे प्रमुख कारण असल्याने अग्निचिकित्सेनेच असे रुग्ण बरे होतात.

पोट फुगणे/ गच्च होणे, अपचन, आय.बी एस अल्सर, पोटदुखी, मूळव्याध, फिशर, संधिवात, स्पॉंडिलायटिस, फ्रोझन शोल्डर, सायटिका, त्वचाविकार, मधुमेह, रक्तदाब, दमा, हृदयविकार, सोरायसिस, एक्झिमा, शीतपित्त, पाळीच्या तक्रारी, वंध्यत्व, पाठीचे विकार इ. सर्व आजारांसाठी आयुर्वेद उपचार.

**डॉ. सत्यन गुजर** आयुर्वेदाचार्य
संपर्क : 9822199851 / 9011640352

मुंबई
१) प्रत्येक महिन्याचा १ला व २ रा रविवार दिनांक ४ व ११ मार्च, वेळ : १० ते ६ C/o. बेस्ट क्लिनिक, राजलक्ष्मी अपार्टमेंट, राजाराणी ट्रॅव्हल्स ते स्टार सिटी सिनेमा रस्ता, शिवाजी पार्क, दादर (प.)
२) प्रत्येक महिन्याच्या तिसरा रविवार दिनांक १८ मार्च, वेळ: १० ते ६ C/o. ठाकुर हॉस्टेल, १२१, विद्याभवन, शिवसेना भवन समोर, शिवाजी पार्क, दादर (प.) मुंबई.

पुणे 'ॐकार आयुर्वेदिक क्लिनिक व पंचकर्म केंद्र' ३८३, सिताराम अपार्टमेंट, मोदी गणपती जवळ, नारायण पेठ, पुणे ३० फोन : ०२०-२४४९२८५८.



॥श्री॥
## पुरुष वंध्यत्व /वीर्य दोष
यासाठी आयुर्वेद उपचार

- शुक्रजंतु कमी असणे/अजिबात नसणे • शीघ्रपतन
- पुरुष वंध्यत्व Hormonal Imblance
- जन्मजात शुक्र दोष, स्वप्न दोष • Semen Volume कमी होणे.
- मधुमेहजन्य लैंगिक तक्रारी • Testosterone कमी होणे.
- वृषणाचा आकार कमी असणे. • वृषणग्रंथाची वाढ न होणे.

## स्त्री वंध्यत्व
यासाठी आयुर्वेद उपचार

- स्त्री शरीर विकृती
- गर्भाशय विकृती
- स्थौल्यामुळे होणारे वंध्यत्व
- बीज न फुटणे
- उष्णताजन्य वंध्यत्व
- PCOD • लैंगिक समस्या
- मासिक पाळी तक्रारी
- क्षय, वंध्यत्व इ. आजारामुळे होणारे

भेटा **डॉ. नितीन थोरात** आयुर्वेदाचार्य (पुणे)
संपर्क : 9221596970/9867980769

सायन: C/o डॉ. निरव छेडा यांचे क्लिनिक, शॉप नं. ६, समर हाऊस, कॅनरा बँक शेजारी, सायन, मुंबई-२२. प्रत्येक महिन्याच्या पहिला व तीसरा रविवार (दि. ४ व १८ मार्च) सकाळी १० ते ५ पर्यंत

कांदिवली: C/o शॉप नं. २, बरखा बहार ठाकूर कॉम्प्लेक्स, साईधाम मंदिराच्यामागे, कांदिवली, पूर्व मुंबई. प्रत्येक महिन्याच्या दुसरा रविवारी (दि.११ मार्च) सकाळी ११ ते ४ पर्यंत

वाशी: C/o आरती पॉली क्लिनिक, पहिला मजला, प्लॉट नं. २१, वाशी बस डेपो समोर, सेक्टर-२. (सोमवार ते शनिवारी सकाळी ११ ते २ पर्यंत)

खारघर: C/o श्री विश्वतेज आयुर्वेदिक पंचकर्म क्लिनिक, शॉप नं.१७ मीरा आर्केड, प्लॉट नं. १४, शिल्प चौकाशेजारी, सेक्टर - २०, (सोमवार ते शनिवारी सायंकाळी ५ ते ९ पर्यंत)

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा
नवाकाळ
।। न मे भक्त: प्रणश्यति ।।
अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# चित्रा साळुंखे! त्रिवार सलाम!

(पान १ वरून चालू)

आता कोर्टाने या सर्वांच्या सीबीआय चौकशीचे आदेश दिले आहेत. नागरिकांच्या बचावासाठी नियुक्त पोलीसच बनाव करू लागले तर करायचे काय? दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुख राकेश मारिया, नवल बजाज, संजय सक्सेना, विश्वास नांगरे-पाटील, ब्रिजेश सिंग, पंकज गुप्ता आणि मोहन राठोड या उच्चपदस्थ पोलीस अधिकाऱ्यांची चौकशी करून तीन महिन्यांत अहवाल देण्याचा आदेश सोमवारी उच्च न्यायालयाने दिला.

कॉलेजचे प्राचार्य, विद्यापीठ, स्थानिक पोलीस स्टेशन, वरिष्ठ पोलीस ही संपूर्ण यंत्रणा बिष्णोई नावाच्या आयपीएस अधिकाऱ्याचे पाप झाकण्यासाठी राबत होती आणि त्याविरुध्द लढत होता एक नागरिक! चित्रा साळुंखे!

पोलीसही न्याय देत नाहीत म्हटल्यावर चित्रा साळुंखे यांनी प्रत्येक पत्र, प्रत्येक निवेदन, आरटीआयमधून मिळालेली माहिती असा पुराव्याचा गठ्ठा घेऊन कोर्टात धाव घेतली. २००५ साली सुरू झालेल्या या लढ्यात सात वर्षांनी चित्रा साळुंखे यांना आशेचा किरण दिसला. त्यांनी ज्यांच्यावर आरोप केले त्या सर्वांची सीबीआय चौकशी करण्याचे आदेश कोर्टाने सोमवारी दिले.

तीन महिन्यांत चौकशी अहवाल सादर होईल. या अहवालाचा निकाल महत्त्वाचा आहेच पण अहवालात काहीही म्हटलेले असले तरी त्याहीपेक्षा चित्रा साळुंखे यांचा लढा अधिक महत्त्वाचा आहे. चित्रा साळुंखे या केवळ स्त्री आहेत म्हणून हे कौतुक नाही. कारण स्त्री अबला आहे हे आम्ही मानतच नाही. चित्रा साळुंखे यांचे कौतुक अशासाठी आहे की स्वत:चा काहीही फायदा नसताना केवळ एक भ्रष्ट प्रकार उघड करण्यासाठी त्यांनी आयुष्याच्या सात वर्षांचे जीवाचे रान केले. खोटी पदे मिळविणारे उच्चपदस्थ पोलीस जनतेच्या संरक्षणासाठी नियुक्त झाले तर या राज्याच्या नागरिकांचे काय होईल या भावनेने त्यांना झपाटले होते.

तुम्हाला नुकसानभरपाई किती हवी आहे असे त्यांना कोर्टाने विचारले तेव्हा त्या म्हणाल्या की, हा लढा सुरू झाला तेव्हा माझा मुलगा १२ वर्षांचा होता. त्याला मी सात वर्षे या लढ्यामुळे वेळ देऊ शकले नाही. मला भरपाई द्यायची असेल तर माझ्या मुलाचे बालपण मला परत द्या.

कुणी हे सर्व वाचून म्हणेल की, चित्रा साळुखेंना लष्कराच्या भाकऱ्या भाजायला सांगितले कुणी? हा प्रश्न विचारणारे आहेत म्हणूनच भ्रष्टाचार फोफावतो. सत्तेचा माज चढतो. पण एक चित्रा साळुंखे येते आणि भ्रष्टाचाराविरुध्द आवाज उठवते. सत्तेचा माज उतरवते. समाजापुढे आदर्श उभा करते. 'लष्कराच्या भाकऱ्या भाजणे' ही म्हण महाराष्ट्राला शोभत नाही. महाराष्ट्राला समाजसुधारकांचे वरदान आहे. म्हणूनच चित्रा साळुंखे यांना आमचा त्रिवार सलाम! तुम्ही लढलात आणि आम्हाला लढण्याची ताकद दिलीत. एक सामान्य नागरिकही न्याय मिळवू शकतो ही प्रेरणा दिलीत! जय हो!!

## सरसंघचालक मोहन भागवत यांच्यावर सर्वोच्च न्यायालयाचे कडक ताशेरे

नवी दिल्ली, ता. २९ - राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्यावर आज सर्वोच्च न्यायालयाने खरमरीत ताशेरे ओढले आहेत. मालेगाव बॉम्बस्फोटात हिंदू संघटनांना गोवण्यासाठी तत्कालीन एटीएसप्रमुख हेमंत करकरे यांच्यावर राजकीय दबाव होता. हे सरसंघचालक मोहन भागवत यांचे विधान बेजबाबदारपणाचे व धक्कादायक आहे, असे ताशेरे सर्वोच्च न्यायालयाने ओढले.

मालेगाव बॉम्बस्फोटातील आरोपी कर्नल श्रीकांत पुरोहित यांना जामिन मिळावा म्हणून केलेल्या अर्जावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. या सुनावणीवेळी राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या वकिलांनी सर्वोच्च न्यायालयाला मोहन भागवतांचे विधान वाचून दाखविले. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने मोहन भागवतांवर ताशेरे ओढले.

## सावंतवाडीजवळ अपघात! १२ जखमी

सिंधुदुर्ग, ता.२९- सावंतवाडी शहरानजीक माणगांव दत्तमंदिर येथे गोवा राज्य परिवहनच्या कदंबा बसला पाठीमागून महाराष्ट्र राज्य परिवहनच्या एसटीबसने जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात कदंबा चालकासह १२ प्रवाशी जखमी झाले. जखमींना सावंतवाडी उपजिल्हा रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले असून, जखमींमध्ये शुभदा अभ्यंकर (५०) रा. मालवण ही गंभीर जखमी झाली आहे. मातोंडहून सावंतवाडी येणाऱ्या एसटीबसने उभ्या कदंबा बसवर धडक दिल्याने झालेल्या अपघातात नयन परब (३०), प्रभाकर परब (५९), सुरेश परब (६५)(तिघेही रा. मातोंड), शरद पेडणेकर (५५) (रा. देवसू), शीतल प्रभू (२८), प्रणाली परब (१८) दोघेही रा. तळवडे, भानुप्रिया तळवटकर (३०), रा. मळगांव, लिलावती धुरी (३०) रा.शेर्ला, पार्वती नाणोस्कर (७०) (रा. नेमळे) शुभदा अभ्यंकर (५०), रा. मालवण व कदंबा बस चालक तुळशीशदास केरकर (४०) (रा. वास्को गोवा) हे जखमी झाले.

## मुखशुद्धी

बंटी चित्रकलेत खूपच कमजोर होता. त्यामुळे चित्रकलेच्या तासाला तो कधीच वर्गात बसत नसे. एक दिवस चित्रकलेचे गुरुजी घंटा होण्याच्या अगोदरच वर्गाच्या दरवाजासमोर येऊन उभे राहिले. त्यामुळे बंटीला वर्गाबाहेर पडता आले नाही. गुरुजींनी सर्व मुलांसमोर मॉडेल पेपर ठेवून चित्र काढायला लावले. सर्व मुले चित्र काढायला लागली. परंतु बंटी बराच वेळ गुरुजीच्या चेहऱ्याकडे बघतच होता. नंतर तोही पेन्सिलने चित्र काढायला लागला.

तो खरेच चित्र काढतो की नुसताच बहाना करतोय हे पाहण्यासाठी गुरूजी त्याच्या जवळ जाऊन उभे राहिले. त्यांनी पेपरवर पाहताच स्वत:चाच चेहरा पाहून ते लालपिवळे झाले.

रागाने ते ओरडेल 'हे काय आहे?'

तेव्हा तो म्हणाला, 'गुरुजी, हे मास्टर-पीस आहे.'

## पंचांग

**गुरुवार, १ मार्च २०१२**
शके १९३३ खरनामसंवत्सर,
✻ फाल्गुन शुक्ल अष्टमी ● **नक्षत्र:** रोहिणी
● रवी उदय ०६-५९, रवी अस्त १८-४३
**जन्मराशी:** ००-०१ ते २४-०० वृषभ
दुर्गाष्टमी

संपादक, मुद्रक, प्रकाशक व संचालक: **सौ. जयश्री खाडिलकर-पांडे**
मुद्रक-प्रकाशन स्थळ : नवाकाळ प्रेस, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगाव, मुंबई -४००००४. टेलिफोन : २३८८०९८१,
जाहिरात विभाग: २३८६०९८७,२३८४१५२४, फॅक्स नं.: २३८१०१७६
वितरण: २३८२४४६६, फॅक्स नं. : २३८६ ०९८९, २३८७ ४९११.
**कार्यकारी संपादक : रोहित पांडे**
info@navakal.org
http://navakal.org
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

## कविता
## एकतर्फी प्रेमात ...

एकतर्फी प्रेमात तिच्या
उगाच वाट चुकलो होतो मी
निरस तिच्या गुलाब अश्रूत
पुरता विरघळलो होतो मी
मित्रांनो वाट चुकलो होतो मी
चंचल गोंडस अदांवर
अहो असा कसा भाळलो मी
प्रकाश म्हणूनी अंधाराच्या मार्गावर
आज अविचाराने धावलो होतो मी
मित्रांनो वाट चुकलो होतो मी
भुरळ पाडणाऱ्या कातील हास्याची
शिकार बनलो होतो मी
ओठातल्या त्या रसीत शब्दांनी
भलताच निहारलो होतो मी
मित्रांनो वाट चुकलो होतो मी
मोती समजून अश्माला त्या
आज का बरं फसलो मी
तिच्या आयुष्यातला गंध नव्हे
तर काटा बनून राहिलो होतो मी
मित्रांनो वाट चुकलो होतो मी
अनावर रात्री तिच्या आठवणी
हृदयात व्यर्थ चुरगाळीत बसलो मी
कुणाची इच्छापूर्ती करणारा फक्त
तुटका तारा बनलो होतो मी
मित्रांनो वाट चुकलो होतो मी
अंध होऊनी तिच्या प्रेमात
जणू कसपटाप्रमाणे वाहलो मी
पण भ्रमाची धूळ माझ्या चक्षूत
अन् दिशाहिन जाहलो होतो मी
काय मिळवलं अन काय गमावलं
प्रेमाचं गणित सोडवत होतो मी
अन् उत्तर माझे मला उमगले
अरे फक्त शुन्यात गणलो होतो मी
मित्रांनो वाट चुकलो होतो मी
तुटकं स्वप्न अन् मोडक घर पाहून
अंतर्यामी बिखरलो होतो मी
जीवन हे सुंदर आहे अन ते जगेन
म्हणून कुठे सावरलो होतो मी
मित्रांनो खरंच वाट चुकलो होतो मी

**- नवनाथ शंकर बनप**
विक्रोळी पार्कसाईट.
मो.क्र.: ९५९४५ १७७ २७

# क्रीडा

## मल्लखांबपटूंसाठी आगळा उपक्रम



**मुंबई, बुधवार - मल्लखांबपटूंना चार पैसे मिळावेत आणि या खेळाला प्रसिद्धी मिळावी या हेतूने पॉझिटिव्ह रेंज इव्हेंन्ट्स प्रा.लि. गतवर्षीपासून महाराष्ट्रातील युवा मल्लखांबपटूंना हाताशी धरून गुजरातमध्ये एका शीतपेय कंपनीची मदत घेऊन विविध ठिकाणी या खेळाची प्रात्यक्षिके आयोजित करण्यास प्रारंभ केला आहे.**

गतवर्षी पहिल्यांदाच गुजरातमध्ये असा उपक्रम राबविण्यात आला होता. त्यावेळी दहा दिवसांचा हा दौरा ठेवण्यात आला होता. त्यावेळी पाच मल्लखांबपटूंचा सहभाग या दौऱ्यात होता. १० दिवसांचे प्रत्येक खेळाडूला १० हजार रुपये देण्यात आले. यंदा परत तोच उपक्रम महिनाभर गुजरातच्या ग्रामीण भागात राबविण्यात येणार आहे. यंदा चार मल्लखांबपटूचे पथक त्यात सहभागी होईल, त्यामध्ये अरविंद जावळे, सचिन चौधरी (दोघे धुळे), आदित्य अहिरे (सातारा), महेश म्हात्रे (मुंबई शहर) या चौघांचा समावेश आहे.

दरदिवशी या मल्लखांबपटूना १००० रुपये मानधन देण्यात येणार आहे. गुजरात सरकार त्यांच्या राहण्याची सोय करणार आहे. नामवंत मल्लखांब प्रशिक्षक उदय देशपांडे यांनी यासाठी पुढाकार घेऊन असे दौरे जास्तीत जास्त आयोजित करण्याचा मनोदय व्यक्त केला. या उपक्रमामुळे खेळाला प्रसिद्धी मिळेल, तसेच खेळाडूंना चार पैसेदेखील मिळतील, असा विश्वास देशपांडे यांनी व्यक्त केला. इतर देखील कंपन्या भावी काळात या उपक्रमासाठी पुढाकार घेतील, अशी आशा मल्लखांबप्रेमी करत असतील.

## वीर तानाजी, बालमित्र विजयी

काल्हेर, ता.२९- येथील बालसेना क्रीडा मंडळाने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत वेताळ, हुतात्मा, वीर तानाजी, बालमित्र संघानी विजयी सलामी दिली. सलामीच्या सामन्यात वेताळ क्रीडा मंडळाने सुखाई देवी संघाचा २६-२ गुणांनी धुव्वा उडविला. दुसऱ्या सामन्यात शांताराम संघाने ओम क्रीडा मंडळाला नमविले. द्वितीय श्रेणी पुरुष गटात वीर तानाजीने एन्जॉय ग्रुप संघावर विजय मिळविला. तर इतर सामन्यात मोनिश ॲण्ड सुदेश संघाने उत्कर्षला आणि बालमित्रने जय मुक्तीधाम संघावर विजय मिळविला. शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले.

## विठ्ठल, एच.जी.एस., बंड्या मारुतीची विजयी सलामी

मुंबई, बुधवार - लोअर परेल येथील श्री साई क्रीडा मंडळाने मफतलाल कॉम्प्लेक्सच्या आवारातील गणेश गोताड क्रीडा नगरीत आयोजित केलेल्या ६५ किलो खुल्या गटाच्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत विठ्ठल, एच.जी.एस., बंड्या मारुतीने विजयी सलामी दिली. पहिल्या फेरीच्या सामन्यात विठ्ठल क्रीडा मंडळाने वीर बजरंगचा चुरशीच्या लढतीत २२-२० गुणांनी पराभव केला. सुरज चव्हाण, सुशिल पवार विजयी संघातर्फे छान खेळले. पराभूत संघाचे सुनील रांजणे, निखील शिंदे चमकले. दुसऱ्या सामन्यात एच.जी.एस. क्रीडा मंडळाने प्रकाश पवार, शैलेश जाधव, संजय शेलार यांच्या दमदार खेळाच्या जोरावर श्री हनुमान क्रीडा मंडळाचा २९-२१ गुणांनी सहज पराभव केला. तिसऱ्या सामन्यात अटीतटीच्या लढतीत बंड्या मारुतीने साईनाथ सेवा ट्रस्टवर २४-२२ गुणांनी निसटता विजय मिळविला. अक्षय सावंत, शुभम चौगुले विजयी संघातर्फे छान खेळले. आणखी एका सामन्यात गोल्फादेवीने जयभारतचा १८-१३ गुणांनी पराभव केला. विजयी संघातर्फे लक्ष्मण दोलतडे आणि विराज उतेकर चमकले. नामदार सचिन अहिर, माजी नगरसेवक सुनील शिंदे, नगरसेविका स्नेहल आंबेकर यांच्या उपस्थितीत स्पर्धेचा उद्घाटन समारंभ संपन्न झाला.




**लंडन ऑलिम्पिकचे भारतीय हॉकी पुरुष संघाचे तिकीट बुक करण्यात भारतीय हॉकी संघातील युवा स्टार खेळाडू संदीप सिंगचा मोठा वाटा होता असे म्हटले तर वावगे ठरू नये. नवी दिल्लीत मेजर ध्यानचंद स्टेडियमवर झालेल्या ऑलिम्पिक पात्रता फेरीच्या महत्त्वपूर्ण स्पर्धेत संदीप सिंगने आपल्या जादुई खेळाची छान झलक पेश केली. त्याने या स्पर्धेत सर्वाधिक तब्बल १६ गोल केले.**

# हॉकीस्टार

निर्णायक फ्रान्सविरुद्धच्या शेवटच्या सामन्यात त्याने तब्बल ५ गोल करून भारताची लंडनवारी यंदा मात्र निश्चित केली. आता ८ वर्षांच्या मोठ्या अवधीनंतर परत एकदा भारतीय संघ मुख्य ऑलिम्पिक स्पर्धेत खेळणार आहे. पेनल्टी कॉर्नरवर हमखास गोल करणारा 'ड्रॅग फ्लिकर' म्हणून संदीपची ओळख आहे. सणसणीत फटके आणि चेंडूला गोल क्षेत्राची हमखास दिशा दाखवण्यात संदीप माहीर आहे. चेंडूवरील त्याचे नियंत्रण वाखाणण्यासारखे असते. पण प्रतिस्पर्धी खेळाडूंकडून चेंडू काढून घेण्यात तो तरबेज आहे. भारतीय आघाडी आणि बचाव फळीतील तो प्रमुख दुवा आहे. कुरू क्षेत्र, हरीरिणा येथे जन्म झालेला संदीप सिंग सध्या भारतीय हॉकी संघातील हरियाणाचा तो एकमेव खेळाडू आहे. नवी दिल्ली स्पर्धेत इटलीविरुद्धच्या लढतीत त्याने शानदार हॅट्ट्रिक केली. तर कॅनडा, पोलंडविरुद्धच्या लढतीत त्याचे २, २ गोल सामन्यात महत्त्वपूर्ण ठरले.

हरियाणा पोलिसांत उपनिरीक्षक असलेल्या संदीपच्या जीवनात अनेक चढ-उतार आले. सहा वर्षांपूर्वी अपघातात चुकून बंदुकीतून सुटलेली गोळी त्याला लागली होती. त्यावेळी तो परत हॉकी स्टिक धरेल की नाही अशी शंका होती. पण जिगरबाज संदीपने भारतीय संघात 'कम बॅक' केलेच. २००८च्या बीजिंग ऑलिम्पिक पात्रता फेरीच्या लढतीत त्याला संघातून वगळण्यात आले होते. राष्ट्रकुल हॉकी स्पर्धेत कांस्यपदक आणि आशियाई हॉकी स्पर्धेत रौप्यपदकविजेत्या भारतीय हॉकी संघात संदीप होता. गतवर्षी अझलन शहा हॉकी स्पर्धेच्या पूर्वी झालेल्या सराव शिबिराला तो गैरहजर राहिला. त्याचवेळी तो बेल्जियममध्ये तेथील लीग स्पर्धेत खेळ होता. त्यामुळे मग त्याला अझलन शहा स्पर्धेत संघात स्थान मिळाले नाही. त्याबाबत त्याने लेखी माफी मागितल्या हॉकी महासंघाने त्याला माफ केले.

पण नंतर त्याने परत बंगलोरचे सराव शिबिरमध्येच सोडून प्रतिस्पर्धी संघटनेने आयोजित केलेल्या 'वर्ल्ड सीरिज हॉकी'च्या पत्रकार परिषदेला हजर राहिला. मग हॉकी इंडियाने याची गंभीर दखल घेत त्याच्यावर दोन वर्षे बंदी घालण्याचा निर्णय घेतला. मग संदीपने याबाबत गयावया केल्यामुळे अखेर त्याची बंदी उठवण्यात आली. २००४च्या अझलन शहा हॉकी स्पर्धेत त्याने आंतरराष्ट्रीय सामन्यात पदार्पण केले. त्याच स्पर्धेत त्याने सर्वाधिक गोल केले. ज्युनियर एशिया कप स्पर्धेत विजेत्या संघात संदीप सिंग होता. तर पोलंड येथे झालेल्या सहा देशांच्या हॉकी स्पर्धेत विजेत्या भारतीय संघात संदीप होता.

संदीपचा मोठा भाऊ ब्रिकमजित सिंग चांगला हॉकीपटू होता. त्याचे बघूनच संदीप मग हॉकीकडे वळला. सुरुवातीला भावाचेच मार्गदर्शन मिळाले. अथक मेहनत घेऊन त्याने अल्प काळात या खेळात चांगली प्रगती केली. आज विश्वातील काही सर्वोत्तम 'ड्रॅग 'मध्ये संदीपचा समावेश होता. ऑलिम्पिक क्वालिफायर स्पर्धेतील त्याची शानदार कामगिरी बघून भारतातील प्रख्यात कंपनी आयएमजीने त्याला करारबद्ध करून मोठीच पोचपावती दिली. तसेच सहारा इंडिया घसघशीत रोख रकमेचे पारितोषिक देऊन गौरव करणार आहे. येणाऱ्या भावी काळात संदीपच्या हॉकी स्टिकमधून अशीच गोलांची बरसात व्हावी अशीच आशा त्याचे तमाम चाहते करत असतील.

## ही आपली लेखणीची जादू आहे

## मनोगत

'गीतेवर बंदी म्हणजे रशियाला दुर्बुध्दी' हा अग्रलेखांच्या बादशहांचा 'नवाकाळ'चा अग्रलेख वाचला. आपण प्रसंगी भारतीय राज्यकर्त्यांवर सडेतोड लिहिता, त्यांची कानउघाडणी करता तसेच वेळ आलीच तर चीन, अमेरिका, पाकिस्तान, रशियासह परराष्ट्रांवरही सडेतोड लिहिता. ही आपली लेखणीची जादू आहे.

अलिकडे ऊठसूठ जो तो भारताचे खच्चीकरण करू पहात आहे. हे कुठेतरी थांबलेच पाहिजे. आता यापुढे तरी भारतीय राज्यकर्त्यांनी मिळमिळीतपणा सोडून ठाम भूमिकेतून राज्य कारभार हाकणे अत्यंत जरुरीचे आहे. जनतेने विश्वासाने हाती सोपविलेले राज्य नीट (भ्रष्टाचारमुक्त) हाकता येत नसेल तर जुन्यांनी बाजूला होऊन ताज्या दमाच्या नेतृत्वांना पुढे येण्यास वाव द्यावा!

मात्र रशियन-दुर्बद्धी जाण्यासाठी भारत सरकारने रशियन-राज्यकर्त्यांना ज्ञानेश्वरीतील पसायदानाचे रशियन व इंग्रजी भाषांतील भाषांतर करून ते त्या देशाला पाठविण्यात यावे. म्हणजे त्यांचे डोळे उघडतील!

**- रामचंद्र पां. परब**
माझंगाव, मुंबई-१०.
मोबा.: ९२२४३ २०७ ५०




# नवाकाळ

मुंबई, गुरुवार १ मार्च, २०१२ पान - ८




# कापसाच्या बोंडाला भाव मिळत नाही म्हणून शेतकरी वळला अफूच्या बोंडाकडे!

(पान १ वरून चालू)

बीड, सांगली, कोल्हापूर येथे अफूची शेती शेतकरी घेऊ लागले आहेत. पोलिसांनी त्यावर कारवाई सुरू केली आहे. शेतकरी अफूसारख्या पिकाकडे कसे वळले आणि शेतकऱ्यांच्या सद्य: स्थितीबाबत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रवक्ते आणि सरचिटणीस सदाभाऊ खोत यांच्याशी चर्चा केली. अफूचे पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांवर कारवाई होते. मात्र खसखस या स्वयंपाकातील पदार्थासाठी शेतकरी याचे पीक घेतच होते, असे खोत म्हणाले.

**शेतकऱ्यांची सद्य: स्थिती कशी आहे, तो अफू सारख्या शेतीकडे वळलाय, यामागे कारण काय?**

काय करणार! आत्महत्येशिवाय शेतकऱ्यांकडे पर्याय नव्हता, आता तो अफूची शेती काढू लागलाय. याला सरकारच जबाबदार आहे. भारत कृषीप्रधान देश असला तरी सध्याची परिस्थिती अशी झाली आहे की, उत्तम नोकरी, मध्यम व्यापारी आणि कनिष्ठ शेती. कर्ज काढून शेतकरी दुष्टचक्रात अडकला आहे. बाजारपेठा बेभरवश्याच्या झाल्या आहेत. शहरांमध्ये व्यापारी, दलालांची मक्तेदारी झाली आहे. परिणामी, शेतकऱ्यांची तरुण पिढी शेतीतून बाहेर पडून शहराकडे वळू लागली आहे. तर काही शेतकऱ्यांनी अफूचा पर्याय निवडला आहे.

महागाईचा अभ्यास करून त्यानुसार शेतकऱ्यांच्या उत्पन्नाच्या आधारभूत किमती ठरवल्या पाहिजेत. पूर्वी १ क्विंटल कापसाच्या दरात १ तोळा सोने येत होते, आता १ क्विंटल कापसाचा भाव ३ हजार रुपये आहे. त्याच्या तुलनेत सोन्याचा भाव दसपटीने वाढला आहे. कपाशीचा भाव तिथेच आहे. जागतिक कारणामुळे फारसा फरक शेतकऱ्यांवर झालेला नाही. गरज असेल तेव्हाच धान्याची आयात करावी, असा डंकन प्रस्ताव आहे. मात्र, सरकारने गरज नसताना धान्य आयात करून शेतमालाचे बाजारभाव पाडण्याचे धोरण अवलंबिले आहे.

**शेतकरी कर्ज फेडू का शकत नाही? शेतीच्या उत्पन्नातून त्याची कर्जफेड होत नाही का?**

सरकार उत्पन्नाचे बाजारभाव पाडते. शेतकऱ्यांच्या हातात काही मिळत नाही. ८० टक्के शेतकरी कर्ज मिळण्यास पात्र ठरत नाहीत. कारण ते थकबाकीदार झालेले असतात. त्यामुळे ते सावकारीच्या विळख्यात जातात. तेथे पूर्ण दबले जातात. कर्जाच्या दुष्टचक्रातून ते बाहेरच येऊ शकत नाहीत.

**सरकारने शेतकऱ्यांना पूरक असे काय धोरण अवलंबणे अपेक्षित आहे?**

बाजारपेठा खुल्या कराव्या लागतील. सरकारने निर्यातीला प्रोत्साहन दिले पाहिजे. महागाईचा अभ्यास करून त्या तुलनेत शेती उत्पादनाचा बाजारभाव ठरवला पाहिजे. शेती उत्पादनांची सवलतीच्या दरात विक्री होते. त्याचप्रमाणे शेतीला लागणारी अवजारे, सामग्री सवलतीच्या दरात शेतकऱ्यांना मिळाली पाहिजेत. निर्यात झोन तयार गेला पाहिजे. जगणे स्वस्त केले तर जगवतोय, तो नष्ट होईल. कृषी प्रधान देशात कृषीचे स्वतंत्र बजेट असायला हवे.

**मात्र, सामान्यांना तर भाज्या, कांदे, शेती उत्पादने स्वस्तात मिळत नाही. त्यांना बरेच पैसे मोजावे लागतात.**

शेतकऱ्यांचे उत्पादन वाशी बाजारपेठेत का आणतात, तेथील व्यापारी दलाल यांच्या खिशात सर्व पैसे जातात. आजही रुमालाखाली सौदा होतो आणि शेतकऱ्यालाही कळत नाही आपल्या मालाची लिलाव किती रुपयांना झालाय. कवडीची किमत शेतकऱ्यांच्या हाती पडते आणि दलाल, व्यापारी गब्बर होतात. मुळात त्यांच्यावर नियंत्रण आणले पाहिजे. शेतकऱ्यांचा भाज्यांचा ट्रक थेट शहरातील विक्री केंद्रात आणला जावा आणि ही विक्रीकेंद्रेही शेतकऱ्यांनी चालविलेली असावीत, तर शेतकरी सक्षम होईल.

कांद्याला जागतिक बाजारपेठेत ४० रुपये भाव मिळत असेल, तरी शेतकऱ्याला माल निर्यात करता येत नाही. पडेल भावात कांदा त्याला इथेच विकावा लागतो. अशा वेळी सरकारने किमान ४० पैकी ३० रुपये भाव तरी शेतकऱ्यांना द्यायला हवा.

**ज्वारीपासून दारू बनविण्यासाठी बराच विरोध झाला**

दारू पिणारा कोणतीही दारू पितो. तो ज्वारीपासून बनवणाऱ्या दारूची वाट पाहात बसत नाही. ऊस, संत्र्यापासून दारू बनतेच. १९६५ साली ६५ टक्के उत्पन्न ज्वारीचे होते. ७० ते ८० च्या काळात ते ३० टक्क्यांवर आले. तर ८०-२००० मध्ये १६ टक्के झाले. आता केवळ साडेतीन टक्के ज्वारीचे उत्पन्न होते. ज्वारी काळी पडली तर त्याचा उपयोग पशुखाद्यासाठी होतो. पैसे मिळत नाही म्हणून शेतकरी ज्वारीचे उत्पन्न घेईनासा झाला आहे.

**कृषी विद्यापीठाचे किती योगदान होते शेतकऱ्यांना?**

कृषी विद्यापीठाचे शेतकऱ्यांची सुशोभित थडगी आहेत असेच म्हणावे लागले. त्यांच्या संशोधनाचे काडीमात्र योगदान शेतकऱ्यांना होत नाही.

**स्वाभिमान संघटनेला नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकांत कसे यश मिळाले.**

शिरोळ जिल्हा परिषदेत आमचे पाच सदस्य निवडून आले. तेथील पंचायत समिती आमच्या ताब्यात आली आहे. पंढरपूर पंचायत समितीत दोन सदस्य आमचे आहे. अकलूज जिल्हा परिषदेत आमचे पाच सदस्य आहेत. आम्ही नवा विचार समोर ठेवून येणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीला सामोरे जाणार आहेत. शेतकऱ्यांमध्ये नवे विचार जनजागृतीचे काम सातत्याने आम्ही करत आहोत. कोणत्याही फॅक्टरीत पीक काढता येणार नाही. त्यासाठी शेतकरी हवाच.

## अकोल्याचा महापौर भारिपचा काँग्रेस पक्षाचा पाठिंबा

अकोला, ता.२९- अकोला महानगरपालिकेत त्रिशंकु परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे सत्ता कुणाची येणार आहे? याबाबत उत्सुकता लागली आहे. यावेळी महापौरपद हे अनुसूचित जातीसाठी राखीव आहे. त्यामुळे महापौरपद हे काँग्रेस पक्षाने भारिप-बहुजन महासंघाला सोडले आहे. भारिप-काँग्रेस-राष्ट्रवादी अशी महाआघाडी स्थापन झाली आहे. महापौरपदावर भारिपचा नगरसेवक विराजमान होणार आहे. महाराष्ट्रात अकोला महापालिकेवर एकमेव आंबेडकरी चळवळीतील महापौरपदावर विराजमान झाला आहे. अकोला महापालिकेत भारिपचे स्वबळावर १० नगरसेवक निवडून आले आहेत.

## नाशिकचा महापौर भाजपाचाच?

नाशिक, ता.२९-नाशिक महापालिकेत शिवसेनेला कमी जागेवर विजय मिळाला. त्यानंतर शिवसेनेने महापौरपदाचा दावा मागे घेतला असून भारतीय जनता पक्ष हाच महापौरपदाचा दावेदार आहे. भाजपच्या महापौरपदाच्या उमेदवाराला शिवसेना पाठिंबा देईल, अशी भूमिका शिवसेनेचे वरिष्ठ नेते मनोहर जोशी यांनी स्पष्ट केली आहे.

## चर्नी रोडमध्ये विनामूल्य गीत रामायण प्रशिक्षण वर्ग

मुंबई, बुधवार- योगिक हिलींग उपचार व उपाय प्रबोधन केंद्र यांच्या वतीने चर्नीरोड येथील वाग्देवधाम संत वाग्देव महाराज चौक कामाबागसमोर हरकिसनदास रुग्णालयासमोर ७४ राजा राममोहन रॉय मार्ग, चर्नीरोड येथे विनामूल्य गीतरामायण प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार ४ मार्च २०१२ रोजी सकाळी १० ते १२ यावेळेत हे प्रशिक्षण वर्ग घेण्यात येणार आहेत. अधिक माहितीसाठी ८८२८८००९५४४, ९९६९८७७३०३ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

## पोलिसांची हप्त्यासाठी शेतकऱ्यांवर कारवाई! -रघुनाथ पाटील

सांगली, ता.२९- सांगली जिल्ह्यात शेतकरी अफूची शेती करीत असल्याचा विनाकारण आरोप पोलीस करीत असून केवळ हप्त्यापोटी ते शेतकऱ्यांची बदनामी करीत आहेत, असा आरोप शेतकरी संघटनेचे नेते रघुनाथ पाटील यांनी केला आहे. शेतकऱ्यांच्या मालाला सरकार योग्य भाव देत नाही. मात्र अफूचे पीक शेतकरी घेत असल्याचे पोलीस खोटेच भासवत आहेत, असेही त्यांनी पुढे बोलताना सांगितले. पोलीस हप्त्यासाठी शेतकरी कारवाई करीत असल्याचा आरोप पाटील यांनी केल्यानंतर जिल्ह्यात एकच खळबळ माजली आहे. पोलीस ड्रग्स बनवणाऱ्या माफीयाला का पकडत नाही? असा सवालही त्यांनी पुढे बोलताना केले.

## देहूच्या गाथा मंदिरात ४ मार्चला होणार ज्ञानोबांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना

मुंबई, बुधवार- जगद्गुरू श्री. तुकोबारायांच्या जन्मचतु:शताब्दीचे औचित्य साधून केलेल्या मूर्तीप्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा वर्धापन दिन व सदेह वैकुंठ गमन सोहळ्याचे निमित्त साधून देहूच्या गाथा मंदिरात ४ मार्चला संत ज्ञानोबांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. त्यानिमित्त दिनांक ४ मार्च ते ११ मार्चपर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या कालखंडात येणाऱ्या भाविकांची राहण्याची व भोजनाची सोय केली जाणार आहे. अन्नदान करणाऱ्या दानशूरांना यामुळे अन्नदानाची सुवर्ण संधी मिळणार असून सप्ताहात उपस्थित राहणाऱ्या भाविकांनी आपली नावे आगाऊ नोंदवावीत, जेणेकरून मंदिर समितीस सुलभरित्या नियोजन पार पाडता येईल.

## आशिया कप क्रिकेट स्पर्धा सेहवागला डच्चू! सचिन खेळणार!

मुंबई, बुधवार- येत्या ११ मार्चपासून बांगलादेशात सुरू होणाऱ्या आशिया कप क्रिकेट स्पर्धेसाठी निवडण्यात आलेल्या भारतीय संघातून भारताचा उपकर्णधार आणि धडाकेबाज सलामीवीर फलंदाज विरेंद्र सेहवागला डच्चू देण्यात आला आहे.

सचिन तेंडुलकरला मात्र संघात स्थान देण्यात आले आहे. ऑस्ट्रेलियातील खराब कामगिरीमुळे सेहवागला वगळण्यात आले असून अष्टपैलू धडाकेबाज फलंदाज युसुफ पठाण आणि वेगवान गोलंदाज अशोक दिंडा यांनी भारतीय संघात पुन्हा 'कमबॅक' केले आहे. ट्राय सीरिजमध्ये खेळलेल्या भारतीय संघातून झहीर खान आणि उमेश यादव यांना देखील वगळण्यात आले आहे. ऑस्ट्रेलियन दौऱ्यात ट्राय सीरिजमध्ये वीरेंद्र सेहवाग साफ अपयशी ठरला. पाच एकदिवसीय सामन्यांत त्याची सरासरी प्रत्येक सामन्यामागे अवघी १३ धावांची आहे. सचिनला देखील आशिया कपसाठी विश्रांती दिली जाणार अशी चर्चा भारतीय क्रिकेट वर्तुळात होती. परंतु त्याला मात्र स्थान देण्यात आले आहे.

विश्वचषक क्रिकेट स्पर्धेनंतर सचिन पुन्हा एकदा एकदिवसीय सामन्यात खेळणार आहे. दिंडा २०१० च्या आशिया कप स्पर्धेत भारतातर्फे खेळला होता. गुडघेदुखीतून युसूफ पठाण सावरला असल्यामुळे त्याला भारतीय संघात स्थान मिळाले आहे. मनोज तिवारी, राहुल शर्मा हे देखील भारतीय संघात असून यष्टीरक्षक पार्थिव पटेलला मात्र वगळण्यात आले. भारताची सलामीची लढत ११ मार्चला होणार आहे. यजमान बांगलादेश, श्रीलंका, पाकिस्तान आणि भारत हे चार संघ या स्पर्धेत खेळणार आहेत. विराट कोहलीकडे भारतीय संघाचे उपकर्णधारपद देण्यात आले.

भारतीय संघ पुढीलप्रमाणे :-महेंद्रसिंग धोनी (कर्णधार), विराट कोहली (उपकर्णधार), सचिन तेंडुलकर, गौतम गंभीर, रोहित शर्मा, सुरेश रैना, मनोज तिवारी, रवींद्र जडेजा, आर. अश्विन, प्रवीण कुमार, विनयकुमार, राहुल शर्मा, युसूफ पठाण, इरफान पठाण आणि अशोक दिंडा.

## मलेरिया रोखण्यासाठी गिरण्यांचे अवशेष पाडा! आयुक्तांचा निर्णय

मुंबई, बुधवार - मुंबई शहरातील मलेरिया रोखण्यासाठी शहरातील महत्त्वाच्या असणाऱ्या गिरण्या याच कारणीभूत आहेत. त्यामुळे गिरण्यांचे अवशेष पाडण्यात यावेत, असा निर्णय मुंबई महापालिकेचे आयुक्त सुबोधकुमार यांनी घेतला आहे. मात्र, मलेरियाच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी गिरण्यांचे अवशेष पाडून बिल्डरांनाही जमीन मोकळी करून दिली जात आहे का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. गिरण्याच्या जागेवर पाणी साचत असेल तर महापालिकेने योग्य कीटकनाशकाची फवारणी करावी, असे निर्देश देण्याऐवजी आयुक्त सुबोधकुमार हे गिरण्याचे अवशेष पाडण्याचे निर्देश का देत आहेत? असा प्रतिक्रिया आता मुंबईत उमटत आहेत.

## शनिवारी यूथ रिपब्लिकनची स्वाभिमानी विजयोत्सव सभा

मुंबई, बुधवार - यूथ रिपब्लिकनच्यावतीने शनिवारी ३ मार्च रोजी सायंकाळी पाच वाजता स्वाभिमानी विजयोत्सव सभेचे आयोजन करण्यात आले आहे. स्वाभिमानी राजकारणाला आंबेडकरी जनता स्वीकारत आहे, हे सांगण्यासाठीच या भव्य सभेचे आयोजन करण्यात आल्याचे रिपब्लिकन नेते नगरसेवक मनोज संसारे यांनी सांगितले.

या विजयोत्सव सभेपूर्वी आंबेडकरी चळवळीतील कलावंत गायक आनंद शिंदे, मिलिंद शिंदे, आदर्श शिंदे, अभिजीत कोसंबी, ऊर्मिला धनगर, शकुंतला जाधव आदी कलावंतांचा प्रबोधन कार्यक्रम होणार आहे. यावेळी यूथ रिपब्लिकन पक्षाने स्वबळावर उभ्या केलेल्या सर्व उमेदवारांचाही सत्कार करण्यात येणार आहे.

## मनसेच्या सहा विभाग अध्यक्षांचे राजीनामे राज ठाकरेंकडे सोपविले!

मुंबई, बुधवार - नुकत्याच झालेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला दक्षिण मुंबई व मध्य मुंबईच्या गिरण भागातून नगण्य यश मिळाल्याने पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून मनसेच्या सहा विभाग अध्यक्षांनी आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडे सुपूर्द केला. या विभाग अध्यक्षांची नावे अरविंद गावडे, संजय नाईक, धनराज नाईक, शरीफ देशमुख, रवी चव्हाण व भूपेन जोशी अशी आहेत.यापूर्वी दक्षिण व मध्य मुंबईची जबाबदारी सांभाळणारे मनसेचे आमदार बाळा नांदगावकर यांनी आपल्या विधानसभेतील गटनेते पदाचा राजीनामा राज टाकरे यांना सोपविल्यानंतर या भागातील विभाग अध्यक्षांनी आपापल्या पदाचे राजीनामे दिले.

शुभराशी-१,२,०




## दुःखद निधन



**कै. श्री. यशवंत नारायण म्हात्रे**

मृत्यः १९ फेब्रुवारी २०१२

*'ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिर शांती देवो'*

हिच ईश्वर चरणी प्रार्थना

दिवस कार्यविधी (तेरावे)

शुक्रवार दिनांक २ मार्च २०१२ रोजी सकाळी १० वाजता राहत्या घरी करण्यात येईल.

*शोकाकुल*

चंद्राबाई यशवंत म्हात्रे (पत्नी)
श्री. जगदिश यशवंत म्हात्रे,
श्री. शैलेश यशवंत म्हात्रे
समस्त म्हात्रे, ठाकुर, पाटील,
आणि भंडारी परिवार

## शिवप्रसाद गृहनिर्माण संस्थेच्या बातमीबद्दल दिनेश जैन यांचा वस्तुस्थितीचा खुलासा

मुंबई, बुधवार - 'नवाकाळ'च्या २६ फेब्रुवारीच्या अंकात 'शिवप्रसाद गृहनिर्माण संस्था आणि बिल्डर करारनाम्यावर विकासक सही का देत नाही' या मथळ्याची बातमी प्रसिद्ध झाली होती. त्याबाबत दिनेश जैन यांनी खुलासा केला आहे की, 'ज्या मेसर्स दर्शन रियालटर्स प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीचा बातमीत उल्लेख झाला आहे त्या कंपनीचा मी संचालकही नाही व पदाधिकारीही नाही. त्यामुळे माझी नाहक बदनामी झाली आहे.

दिनेश जैन म्हणतात की, बातमीत असेही म्हटले आहे की, म्हाडाने दिनेश जैन यांना काळ्या यादीत टाकले आहे. मात्र हे सत्य नाही. म्हाडाने मला काळ्या यादीत टाकलेले नाही. तसेच शिवप्रसाद गृहनिर्माण संस्थेच्या वस्तीतील कुठच्याही झोपडीधारकला जबरदस्तीने जागा खाली करावयास लावलेले नाही. अशा कुठच्याही कारवायांमध्ये मी कधीही भाग घेतलेला नाही. मी कायद्याचे पालन करणारा जबाबदार नागरिक आहे. मी एक समाजातील प्रतिष्ठित व शांतताप्रिय माणूस आहे. माझ्यापासून आजपर्यंत समाजात कुठचाही शांततेचा भंग झालेला नाही. त्यामुळे 'नवाकाळ'मधील या वृत्ताने माझ्या प्रतिष्ठेला तडा गेला आहे. त्याबद्दल मला प्रचंड यातना होत आहे.

